अनुबंध

नोव्हेंबर २०२२
कार्तिक शके १९४४

झुंज एका वादळाशी

अनुक्रमणिका

- **संपादकीय**
- **अनुबंध संपादक समिती**
- **अध्यक्षीय मनोगत**
- **कार्यकारिणी समिती**
- **मागोवा**

- **ललित लेख**
  - Every Cloud has Silver lining. - सुजाता डोळस ढेंगे
  - तमसो मा ज्योतिर्गमय - विप्राली भाटकर
  - लाडू चकली बिना दिवाळी - ज्योती जोशी
  - कोविड - एक अनुभव - डॉ डी आर डोके
  - Life of a Public-School Teacher During Pandemic - समिधा साने

- **कथा**
  - चिमणलाल - श्रीनिवास जांभेकर
  - गृहीत - भास्कर पवार भारंप
  - अनुभूती - भास्कर पवार
  - **कोविडने शिकवली माणुसकी** - प्रतिभा गोखले
  - आधुनिक श्रावणबाळ - डॉ डी आर डोके

- **कविता**
  - स्वर्गसुख - ज्योती जोशी
  - आता स्वतःसाठी जगा - श्रीनिवास जांभेकर
  - करोनाच्या साथीत - ज्योती जोशी
  - तिच्या स्वरांचे संदर्भ - किरण डोंगरदिवे
  - कोविड - स्वाती नामजोशी नातू
  - Home - मीरा साळुंखे
  - Chocolate Lindor - मीरा साळुंखे
  - Friend - मीरा साळुंखे
  - वादळी - नयना निगलये
- शब्दकोडे
- चित्रकला - सची रासने
- चित्रकला - तन्वी कटके
- चित्रकला - सोनाली गोखले
- विशेष आभार

- **आवाहन (पुढचे लिखाण)**

संपादकीय

नमस्कार मंडळी,

अनुबंध समिती २०२२-२०२३ च्या पहिल्या अंकाचे प्रकाशन करतांना आम्हाला खूप आनंद होतो आहे.

जानेवारी २०२२ मध्ये, श्रीमती स्वाती शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली न्यू इंग्लंड मराठी मंडळाच्या नव्या कमिटीची स्थापना झाली. त्यानंतर लगेचच अनुबंध या अंकाला पुन्हा नव्याने उभारी देण्यासाठी, अनुबंध समितीची आखणी केली गेली. मंडळाचे सण, सभारंभ साजरे होत असतांनाच एकीकडे अनुबंध चे कामही जोमाने चाललेले होते.

गेल्या दोन वर्षांपासून आपण सर्वांना काही ना काही अडचणी येतच आहेत व आपण त्यातून मार्ग काढून परिस्थितीशी लढत पुढे जात आहोत. त्या आपल्या लढाईच प्रतीक म्हणुन आमच्या समितीने यंदाच्या अंकाचा विषय "झुंज एका वादळाशी" हा निवडला आहे. विविध व्यक्तींनी ह्या चालू असलेल्या लढाईचे अनुभव लेखांच्या, कथांच्या, कवितेच्या, चित्रांच्या माध्यमातून व्यक्त केले आहे. हे सर्व साहित्य एकत्र करून ते आपल्यापर्यंत पोहोचवण्याचे कार्य, या अंकाच्या माध्यमातून आम्ही करीत आहोत.

अंकाचे मुखपृष्ठ हे स्वरा कुलकर्णी ह्यांनी खूप जाणीवपूर्वक रेखाटले आहे. अंकासाठी लागणारी तांत्रिक मदत, अंक जुळवणी, प्रूफ रिडींग इत्यादी कामे, मराठी भाषेची चांगली जाण असणारे अमेय परांजपे, अर्चना पानवलकर, यांनी पार पाडली **आहे** तर अंकाची सजावट, बांधणी यासाठी श्रेया जोशी यांची खूप मदत झाली.

दुःख हे मानवी जीवनाचं एक अभिन्न अंग आहे असं गौतम बुद्धांनी सांगून ठेवलेलं आहे, त्यामुळे जीवनातील चढउतारांना सामोरे जाणं हा जगण्याचाच एक भाग आहे. त्यानुसार वेगवेगळ्या क्षेत्रातील व्यक्तींना कशाप्रकारचे अनुभव आले व **ते ह्या सर्व अडचणींना कशे सामोरे गेले** याचा प्रत्यय आपल्याला या अंकात येईल. तसेच नव्या पिढीतील तरुणांना, मुलांना जो घरी राहून शिकण्याचा अनुभव आला तोही त्यांनी आपल्यापरीने मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

भाषे अभावी स्वतःचा अनुभव लोकांपर्यंत पोचवता आला नाही असे होवू नये म्हणून आम्ही काही इंग्रजी साहित्य देखील ह्या अंकात समाविष्ट केले आहे.

आपणासर्वांना हा अंक नक्कीच आवडेल अशी अपेक्षा.

धन्यवाद,
- सुधीर डोके

अनुबंध संपादक समिती

संपादक : अमेय परांजपे

संपादक सहाय्य : सुधीर डोके, अर्चना पानवलकर

मांडणी व सजावट : अमेय परांजपे, श्रेया जोशी

जाहिरात सहाय्य : रवी रासने, स्वाती शिंदे

मुखपृष्ठ : स्वरा कुलकर्णी

॥ न्यू इंग्लंड मराठी मंडळ ॥
NEW ENGLAND MARATHI MANDAL

अनुबंध मासिकात जाहिरात करण्यासाठी कृपया संपर्क करा:

स्वाती शिंदे (संपादक) - swati.shinde@nemm.org
सुधीर डोके (वित्त) - sudhir.doke@nemm.org

***लेखांत व्यक्त झालेली मते ही पूर्णपणे संबंधित लेखकांची आहेत. न्यू इंग्लंड महाराष्ट्र मंडळ तसेच संपादक समिती त्यांच्याशी सहमत असेलच असे नाही.
***अंकासाठी सर्व काळजी घेतली गेली असली तरी छपाईत किंवा अन्य इतरत्र काही चूक भूल झाली असल्यास उदार मनाने ती नजरेआड कराल अशी आशा आहे.

***अनुबंध मासिकामध्ये सुशोभीकरणासाठी वापरण्यात आलेली चित्रे ही माहिती अंतर्जालातून घेण्यात आलेली आहेत. त्यांचे मालकी हक्क संबंधित मालकांकडे असून न्यू इंग्लंड महाराष्ट्र मंडळाकडे नाहीत.

अध्यक्षीय मनोगत

नमस्कार मंडळी,

सर्वात्मका शिवसुंदरा स्वीकार या अभिवादना !
तिमिरातुनी तेजाकडे प्रभु आमुच्या ने जीवना !!

जवळजवळ २ वर्षे जगभर कोविड साथीमुळे पसरलेला अंधकार सरून आपणा सर्वांना आपलं आयुष्य पुन्हा नव्या उत्साहाने आणि बंधनमुक्त जगता यावं हि ईश्वरचरणी प्रार्थना करत , जानेवारी २०२२ मध्ये आम्ही न्यु ईंग्लंड मराठी मंडळ समितिच्या कामकाजाला सुरुवात केली.न्यु ईंग्लंड मराठी मंडळ हि फक्त एक संस्था नाही आहे ;ते एक कुटुंब आहे. ह्या कुटुंबाला बांधणारा धागा अधिक बळकट करण्याच्या उद्देशाने आम्ही नवनवीन कार्यक्रम आयोजित केले आणि नव्या संकल्पना सादर केल्या. कार्यक्रमांचे आयोजन करताना आम्ही प्रामुख्याने ५ गोष्टींवर भर दिला ज्यामुळे १) आपला मराठी सांस्कृतिक वारसा पुढे चालू राहील २) स्थानिक कलाकारांना आपले कलागुण सादर करण्याची संधी मिळेल ३) दर्जेदार करमणुकप्रधान कार्यक्रमातून लोकांचं मनोरंजन होईल ४) सामाजिक कार्याला हातभार लावता येईल . आणि ५) सभासद संख्येमध्ये वाढ करून आणि नवीन प्रायोजक मिळवून मंडळाची आर्थिक बाजू सुधृड राहील. गेल्या एक वर्षाचा आढावा घेतला तर ही पाचही उद्दिष्टे आम्ही यशस्वीपणे पूर्ण केली असं मी नक्कीच सांगू शकेन.

गेल्या वर्षभरात आम्ही आपला मराठी सांस्कृतिक वारसा पुढे चालू ठेवण्यासाठी मकर संक्रांत ,गुढी पाडवा , महाराष्ट्र दिन , गणेशोत्सव आणि दिवाळी हे सण जल्लोषात साजरे केले . आमचा पहिला मकर संक्रांतिचा कार्यक्रम कोविडच्या तिसऱ्या लाटेमुळे ऑनलाईन करावा लागला . फारच कमी वेळात आम्ही भारतातून एक संगीतप्रधान कार्यक्रमाची निर्मिती केली आणि हा कार्यक्रम तसेच "कौटुंबिक प्रश्नमंजुषा" ही कौटिम्बिक स्पर्धा ऑनलाईन आयोजित केली. कार्यक्रम यशस्वी झाला पण आपल्या लोकांना प्रत्यक्ष भेटता आलं नाही हि चुटपुट मनाला लागून राहिली. ती संधी आम्हाला मिळाली आमच्या गुढी पाडव्याच्या कार्यक्रमात आणि मकर संक्रांतीच्या निमित्ताने स्त्रियांसाठी आणलेली वाणं आम्हाला प्रत्यक्षात देता आली . गुढी पाडव्याचा सण हे वाईट गोष्टींवर मिळवलेल्या विजयाचं प्रतीक आहे आणि कोविड वर मिळालेला विजय साजरा करण्यासाठी गुढी पाडव्याव्यतिरिक्त दुसऱ्या कुठल्या सणाची अपेक्षा मी करू शकत नव्हते. मराठी माणूस नाटक वेडा असतो म्हणून गुढी पाडव्याच्या कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण होते स्थानिक कलाकारांनी केलेल्या तीन एकांकिका. कोविडची परिस्थिती निवळल्यानंतर झालेल्या ह्या पहिल्या कार्यक्रमाला लोकांनी दिलेला प्रतिसाद बघून मन तृप्त झाले.

महाराष्ट्र दिनाचा सोहळा सादर करताना सुद्धा आमचा प्रमुख उद्देश स्थानिक कलागुणांना जास्तीत जास्त वाव मिळावा हाच होता. तो उद्देश ठेवून आम्ही प्रस्तुत केले स्थानिक कलाकार निर्मित नाटक "माकडाच्या हाती शॅम्पेन ' . त्याबरोबरचआयोजित केली वेशभूषा स्पर्धा आणि पाककृती स्पर्धा ज्यामध्ये विविध वयोगटाच्या स्पर्धकांनी मोठया संख्येने भाग घेतला. वेशभूषा स्पर्धेमध्ये स्पर्धकांनी महाराष्ट्रातले थोर आणि कर्तृत्ववान स्त्री- पुरुषांसारखी वेशभूषा करून त्या महान व्यक्तिमत्वांची आठवण करून दिली . पाककृती स्पर्ध्येमध्ये स्पर्धकांनी आपल्या पाककलेतला हातखंडा दाखवला. आपल्या स्थानिक कलाकारांचे कलागुण बघून खरंच खूप अभिमान वाटतो आपल्या मंडळाचा.
जुलै महिन्यात आयोजित केलेल्या पिकनिकलाही आम्हाला भरगोस प्रतिसाद मिळाला . लोकांना लगोरी ,रस्सीखेच, चमचा लिंबू इत्यादी खेळ खेळत आणि एकत्र गप्पा मारत सहभोजन करताना पाहून आपणा सर्वांचं सामाजिक जीवन पुन्हा पूर्ववत होत चाललं आहे ही खात्री पटली.

मराठी मनातली आपल्या लाडक्या गणेशोत्सवाबद्दल वाटणारी भव्यता अतुलनीय आहे. आमच्या समितीसाठी गणेशोत्सवाची ही भव्यता जपणं खूप महत्वाचे होते . त्या भव्यतेला अनुसरून आम्ही गणेशोत्सवाच्या निमित्ताने विविध कार्यक्रम आयोजित केले . गणेशपूजेबरोबर अथर्वशीर्ष पठणाने झालेल्या नादघोषाने वातावरणाचे

पावित्र्य वाढले. गणेशदर्शनाचा लाभ सर्वाना व्हावा ह्या उद्देशाने हा गणेशोत्सवाचा कार्यक्रम फक्त मंडळाच्या सभासदासांठी मर्यादित न ठेवता , न्यू इंग्लंड प्रांताच्या सर्व रहिवाशांसाठी खुला केला आणि अनेक अमराठी लोकांनी मोठ्या संख्येने येऊन गणरायाचे दर्शन घेतले. गणपतीची आरास "गणराज रंगी नाचतो " ह्या भारतरत्न लता दीदींच्या गाण्यावर आधारित होती . बोस्टनच्या "हॅच शेल " ह्या प्रसिद्ध प्रेक्षागृहात गणराज रंगी येऊन नाचतो आहे असा देखावा गणपतीच्या आरास मध्ये दाखवला गेला . उत्सवाला आणखी रंगत आणली ती ढोल ताशा आणि लेझीम च्या पथकाने . जवळ जवळ १०० हुन अधिक कलाकारांनी ढोल ताशा आणि लेझीम वर बाप्पाची वाजत गाजत मिरवणूक काढली. "NEMM जोश" ह्या मंडळाच्या ढोल पथकाने आपल्या तालबद्ध वादनाने केलं मंत्रमूग्ध. खास कनेक्टिकट वरून आलेल्या २० विद्यार्थ्यांच्या गटाने मल्लखांब प्रात्यक्षिक दाखवून ह्या मराठी खेळाची सर्वांना ओळख करून दिली. ह्या वर्षी आम्ही गृहिणींवर केंद्रित असलेली एक कौटुंबिक स्पर्धा आयोजित केली होती "NEMM गृहसम्राज्ञी' . ह्या स्पर्धेतर्गत आम्ही वेगवेगळ्या शहरात स्पर्धकांच्या घरी जाऊन स्पर्धक गृहसम्राज्ञी आणि त्यांच्या परिवारां बरोबर गमतीदार खेळ खेळलो . ह्या सर्व स्पर्धा आम्ही विडिओ रेकॉर्ड करून वेब सिरीज च्या माध्यमातून तुमच्यापर्यंत पोहोचवण्याची व्यवस्था करत आहोत . ह्या स्पर्धेची अंतिम फेरी गणेशोत्सवाच्या दिवशी आयोजित केली होती. ५ प्रतिस्पर्धी महिलांमध्ये झालेली ह्या स्पर्धेमध्ये झाली मनोरंजक प्रश्नोत्तर , रुचकर उखाणे आणि मजेदार खेळ . पहिल्या आलेल्या प्रतियोगितेला मिळाला "NEMM गृहसम्राज्ञी' हा किताब आणि एक उंची पैठणी . सर्वात शेवटी झाला मराठी वाद्यवृंदाचा कार्यक्रम "रेट्रो ते मेट्रो" ज्यात झाली जुन्या सदाबहार आणि नवीन गाण्यांची मैफिल. स्थानिक कलाकारांच्या कलागुणांना वाव मिळाल्यामुळे आणि उत्तम दर्जाचे संगीत ऐकायला मिळाल्यामुळे कलाकारांना आणि रसिक प्रेक्षकांना समाधान मिळालं . लोकांच्या चेहेऱ्यावरचे समाधान आणि त्यांनी दिलेली दाद हि पावती होती आपल्या गणेशोत्सव कार्यक्रमाच्या भव्यतेची .
आता वर्षाची सागंता होणार आहे दिवाळीच्या कार्यक्रमाने . आपल्या सभासदांना दर्जेदार कार्यक्रम देण्याच्या भावनेतून दिवाळीला खास आयोजित केलं आहे सदाबहार विनोदी नाटक "मोरूची मावशी" आणि तुम्हाला ते आवडेल ह्यात शंकाच नाही.

सामाजिक जबाबदारी पार पडण्याच्या उद्देशाने आम्ही युवा सदस्यांच्या साहाय्याने २ फंडरेझर आयोजित केले . गुढी पाडव्याच्या दिवशी बेकिंग सेल करून आलेला निधी सेंट ज्यूड्स हॉस्पिटलला आणि गणपतीला बनवलेले कंदील विकून आलेल्या रकमेतून भारतात गरीब विद्यार्थ्यांसाठी शाळा चालवणाऱ्या "लेहेरे ' ह्या संस्थेला देणगी म्हणून दिली गेली.

कोविड मुळे वाढलेल्या महागाईमुळे कार्यक्रम आयोजनाचे खर्च प्रचंड प्रमाणात वाढले. परंतु मेम्बरशिप फी वाढवण्याऐवजी इतर प्रकारे आम्ही निधी कसा उभारू शकू ह्यावर आम्ही जास्त विचार केला. सांस्कृतिक कार्यक्रमाबरोरच आमचा भर मंडळाची सदस्य संख्या वाढवण्यावर होता . सिनेमारसिकांना आकर्षित करण्यासाठी आम्ही पावनखिंड , शेर शिवराज आणि चंद्रमुखी असे तीन चित्रपट जवळच्या सिनेमागृहात आयोजित केले . ह्या चित्रपटाच्या निमित्ताने आम्हाला नवीन लोकांशी संपर्क साधता आला आणि त्याबरोबरच नवीन सदस्यांची नोंदणी झाली. सिनेमाच्या तिकीट विक्रीमुळे मंडळासाठी निधी उभारता आला . युवा पिढीबरोबर दुवा साधण्यासाठी आम्ही रील्स आणि सोशल मीडियाचा पुरेपूर वापर केला. ढोल ताशा पथकाला एक नवे रूप देण्यासाठी आम्ही, आर्थिक गुंतवणूक करून "NEMM जोश " हा ब्रँड निर्माण केला . बीएमएम ला झालेल्या ढोल ताशा स्पर्धेतही आपल्या पथकाने लोकांची मने जिंकली . ढोल ताशाची ओढ लक्षात घेऊन आम्ही "युवा पथक" आणि "महिला पथकाची" स्थापना केली ज्यामुळे खूप नवीन लोक मंडळात सामील झाले. अधिकाधीक सदस्य नोंदणी करण्यासाठी आयोजलेल्या ह्या वेगवेगळ्या उपक्रमासोबतच आम्ही अधिकाधिक प्रायोजक मिळवण्याचा जोरदार प्रयत्न केला . अमेरिका आणि भारतातूनही वेगवेगळ्या प्रयोजकांकडून देणगी घेण्यात आम्हाला यश मिळाले.

हे सर्व कार्यक्रम आयोजित करताना आणि उपक्रम चालवताना अडचणी तर आल्याच पण माझ्या समितीच्या टीम मुळे आणि आपल्या सर्वांच्या प्रेमामुळे कुठलीही अडचण हे आम्ही आव्हान म्हणून स्वीकारले. तुमच्या सर्वांच्या चेहेऱ्यावर दिसणाऱ्या आनंदामुळे आणि पाठीवर पडणाऱ्या शाब्बाशीच्या थापेमुळे आम्हाला पुढे जाण्याची हिम्मत मिळते . आमच्या कडून काही चुकाही झाल्या असतील पण तुम्ही सर्वांनी वेळोवेळी दिलेल्या प्रतिक्रियेमुळे आणि

मार्गदर्शनामुळे आम्ही सदैव सुधारणा करण्यासाठी तत्पर राहू आणि ह्यावर्षीसारखाच पुढच्या वर्षीसुद्धा नव्या जोमाने तुम्हा सर्वांच्या सेवेला रुजू होऊ .

🙏

स्वाती शिंदे,
अध्यक्षा, न्यू इंग्लंड मराठी मंडळ

कार्यकारणी समिती (२०२२-२३)

स्वाती शिंदे

स्मिता लाटे

रवी रासने

सुधीर डोके

अंकुश आठले

श्रेया जोशी

बकुल कानडे

अदिती मांजरेकर

अर्चना पानवलकर

लीना परब


अमेय परांजपे

वृषाली फिरके

मिलिंद रानडे

श्वेता साळवी

स्वप्नील शिंदे

सचिन येवला

मागोवा

नमस्कार मंडळी, मागील काही महिन्यात गृहसम्राज्ञी आणि गणपती उत्सव हे कार्यक्रम अत्यंत उत्साहात पार पडले. याच कार्यक्रमाची काही क्षणचित्रे येथे देत आहोत.

KM
KINJAL MISTRY

ललित लेख

Every Cloud Has a Silver Lining

- सुजाता डोळस ढेंगे

All of us face challenges at one point or another in our lives. They come in different forms like health crisis, loss of loved one, financial setbacks, relationship issues etc. but one thing is for sure it tests who you are at the core and forces you to look within. I am always intrigued by other people's experiences and journeys, but the stories that inspire me the most are the ones in which people go through these difficult life situations without losing zeal for life, being optimistic, not turning bitter towards life and emerge stronger than before.

I live in Billerica with my loving husband and wonderful son who is 26. We moved to US when we were quite young. Left behind family, friends, everything familiar to start a new life. A dotting husband and an adorable baby, I had everything one could have asked for. My journey in this world of disability started around 25 years ago as I realized that my son was not reaching developmental milestones as expected. That's how started my lengthy and difficult struggle navigating through the intricate maze of special education, medical, legal systems, fight with bureaucracy, finding right resources, support, providers and services. I went through denial, guilt, anger, frustration, disappointment and helplessness. I still remember those sleepless nights and phases of constant worry. When I was shoved in face with such life changing challenge, I became numb but my motherly instincts kicked in and I spun into an action mode. I started learning, reading and educating myself about disability and special needs education system and laws. I was fighting battles on two different fronts. One was inner turmoil and the other one was on outer front where I was trying to find right placement, right therapies and providers for my son. Initial years were like swimming against the current and was an uphill battle. I was engulfed by a feeling of self-doubt, despair and fear of raising a child with so many complex issues. There was no set mold and I knew I had to carve my own path.

The most important step towards healing was acceptance. It made me appreciate good things in life. Financial stability, good educational background to fight for my son's rights, self-advocacy skills and a compassionate partner who is with me through thick and thin, to name a few. I made a conscious choice to drop all forms of resistance and allowed the life to flow with ease. Once I overcame the inner battle, outside situations seem less daunting.It takes a village to raise a child and I witnessed it firsthand. Many people held my hand when I needed it the most. I have attested goodness in the world around me in the form of teachers, therapists, speech pathologists, physical therapist, doctors, nurses, caseworkers, attorneys, social workers,

friends, neighbors, strangers and so many more. I came across so many good people and their genuineness touched my heart. I am so grateful for everyone who crossed my path and helped me in their own way.

I am always cautious in using the phrases like "Sankatacha dongar kosalala" or "Eka vadalashi zunj". In any way, I don't want to belittle the hard times people go through, but in my opinion, it makes it easier if we look at it as an opportunity to grow and learn. It was a great learning experience for me personally and my family. Life has taught me so many life lessons. Human spirit is designed to thrive on challenge. Challenges can break you down or lift you up and I chose the latter. Such life changing events completely change you as a person and your perspective towards life. They nudge you to reevaluate your priorities and do some soul-searching and dictate your every action and decision. It made me physically, mentally, emotionally stronger and resilient.

My son taught me patience, compassion, tolerance and helped be to become a better parent. He turned my apprehensions to aspirations. He has surpassed my every expectation and went above and beyond. He has become my pillar of strength and source of inspiration. When I get stressed out, he reminds me to take a chill pill and relax. He loves our family mantra "We are a team. Let's do it together". It made my family stronger. Now, my focus is creating happy memories along the way, make him independent and trying my best to create joyful and healthy environment to nurture him without losing myself in the process. It is a journey full of tears, disappointments, joy and hope but I am content that it's a very rewarding journey! I am well aware that it's not going to be an easy road ahead but I have learned the skills to bounce back from setbacks and to strengthen my resolve whenever life throws a curveball at me.

As they say, every cloud has a silver lining. It made me a better human being.

Become a Member

न्यू इंग्लंड मराठी मंडळाचे सभासद व्हा आणि आपले बंध, सांस्कृतिक वारसा मराठी मातीशी कायम जोडून ठेवा.

For Membership details click here:
http://nemm.org/index.php/membership/become-a-member-renew-membership

तमसो मा ज्योतिर्गमय

- विप्राली भाटकर

"स्थितीस्थापकत्व" किंवा "लवचिकता", मानवाचा अत्यंत महत्वाचा गुणधर्म! त्याचा सामूहिक अनुभव वारंवार पाहायला मिळाला गेल्या अडीच वर्षात! फेब्रुवारी २०२०, मेक्सिको च्या सहलीची तयारी अगदी जोरदार झाली होती. मार्च महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यात निघायचं बेत होता. आलिकडे चीन च्या वुहान शहराच्या रहस्यमय कोविड १९ विषाणूच्या दहशतीच्या बातम्यानचा कहर झाला होता. एकीकडे आगामी प्रवासाचे वेध लागले होते तर दुसरीकडे मन ह्या नव्या विषाणूच्या बातम्यानी बेचैन झाले होते. शेवटी सहल पूर्ण करायचे ठरले. मेक्सिको च्या Cancun शहरात वातावरण अगदीच वेगळे होते. समुद्राचे खारे वारे, लाटांची गाज आणि कुटुंबाच्या सानिध्यात रोजच्या धाकधकीचा आणि कोविडचा पूर्ण विसर पडला होता. आनि अचानक who ने कोविडची महामारी जाहीर केली., यूरोप मधल्या देशांनी हवामार्गावर निर्बंध जाहीर केले. आमच्यासारखा साऱ्या प्रवाशांची आता चांगलीच तारांबळ उडाली. आनंदाच्या सागराला ओहोटी लागली. सर्वाना घरचे वेध लागले. विमानतळ अगदी गच्च भरले होते. जो तो नाकातोनदाला रुमाल किंवा काही कापड गुंडाळून प्रवासाला सज्ज झाले होते.

परत येईपर्यंत इथे अमेरिकाला वातावरण पार बदलले होते. दुकानामद्धे मूलभूत गोष्टी सुद्धा मिळणे कठीण झाले होते. जो तो सर्व गोष्टींचा आणि औषधांचा साथ करण्यात व्यस्त होते. मग आले मास्क, सोशल distancing, पाण्याचा वाफा, घरगुती उपचार, भीती, भ्रम, खोट्या अफवा, राजकीय बेत ह्यांनी जोर धरला होता. माणसाला एका सूक्ष्म जीवने अगदी जेरीस आणले होते. टीव्ही चननेल्स सतत मृत्यूच्या भयाण आणि मेडिकल साधानांच्या कामतरतेच्या बातम्या दाखवत होते.

आशावेळी मन एकदम सुन्न झाले. साता समुद्रांपार असलेल्या जीवळगाच्या भेटीसाठी आसुसले. टयांच्या काळजीने जीव पिळवटून निघे. हळूहळू ओळखितल्या लोकांच्या आजाराच्या आणि मृत्यूच्या खबरी येऊ लागल्या. खरंतर देशापासून इतक्या लांब आसल्याने आशा वारतांची खरी धग प्रकर्षाने कधी जनवलीच नाही. ह्यांचे दुकख ही होते आणि लाजही! परंतु पूनहा पूनहा स्थितीस्थापकत्व वाचा गुणधर्म जाणीव करून द्यायचा की खचून जाण्यात आणि बधिर होण्यात काहीच अर्थ नव्हता. इथे चार भिंतीमध्ये lockdown होऊन आम्ही कंटाळत होतो, तकरार करत होतो आणि तिथे सर्व मेडिकल कर्मचारी, पोलिस, वैज्ञानीक रात्रंदिवस एकत्र झटून आमच्या सुरक्षेचे कवच अभेद्य ठेवत होते.

मी ह्या महामारीची गर्द काळोखी बाजू दुर्लक्षित करत नाहीये परंतु ह्या सर्व धकाढकीत एक गोष्ट मात्र वरदान ठरली. ह्या आंधरच्या कुशीत नाव प्रकाश, नाव दृष्टिकोण, नवी आशा कूस घेत होती. Lockdown मुळे सर्व जग अचानक आकसले, जवळ आले. सर्वांकडे अचानक खूप रिकामा वेळ होता. कामाच्या रगाड्यांत अडकलेले आई बाबा, अभ्यासाच्या वाजनखाली दबलेले बालपण, सोशल मिडिया वर अडकलेला मित्रपरिवार ह्या सर्वाना आपसूकच एक दुसऱ्याची जाणीव झाली. वर्क-लाइफ बॅलेन्स सहजच आला. वायरस होताच, त्याने जगात तांडव तर घातलाच पण माणसाच्या मनाच्या, भावनांच्या, बुद्धिमत्तेच्या, आणि सामाजिक लवंचिकतेपुढे त्याने आता हात टेकले होते!

लाडू चकली बिना दिवाळी

- ज्योती जोशी

नॉर्टन नावाचं एक आटपाट नगर होत. तिथे एक जेष्ठ नागरिकांची वसाहत होती. त्यांचा उत्साह तरुणांना लाजवेल असा होता. सर्वांचे एक मोठ्ठे कुटुंबच असे घरोब्याचे स्नेह संबंध. शेजार धर्म-मदतीचा वसा कटाक्षाने पाळत.

तिथे एक ज्योतीआजी रहात असे.

जगांत मरीआईचा कोप झाला नी करोना-संहार सुरू झाला. सगळीकडे हाहा:कार उडाला.

करोनाच्या राज्यात मास्कमुळे आजी घुसमटली. सक्तीची घरबंदी, कोणी चिटपाखरू दिसेना. तिला एकटेपणा खायला उठला.

एकीकडे निवडणूकीचे वारे वहात होते.

अमेरिकेत स्त्री ही राजवटीत उच्च पदावर येण्यास अजून बराच अवकाश आहे अशी निराशा ज्योतीआजीच्या मनात घर करून बसली.

शेवटी एकदां मतदान झाले. -न भूतो न भविष्यति. बायडनबरोबर कमला ह्यारीस नव्या राजवटीत निवडून आली.. आशेचा किरण डोकावला. स्त्री शक्ती नव्याने जागृत झाली.

दिवाळी अगदी दारी येऊन ठाकली होती. सण हे इतरे जनांनबरोबर साजरे करावेत हा तिचा अट्टाहास कायम असे. करोनाच्या मरीआईचा ऱ्हास झुगारून ज्योति आजीने दिवाळी साजरी करावयाची ठरवली.

लगेच तिन इमेलवर तिच्या शेजारी पाजाऱ्याना आमंत्रण धाडले,

"मित्रहो, दिवाळी साजरी करायला या. माझ्या घरासमोर मोठा पार्किगलॉट आहे तिथे तो समारंभ होईल. तरी येतांना स्वत:ची खुर्ची व प्यांडामिकचे सामाजिक बंधन mask, no food इ. इ. नियम पाळले जातील."

पार्टीचा दिवस उजाडला. सुमारे 52 जण वेळेच्या आधीच हजार झाले. पार्किगलॉटमध्ये सर्व गोलाकार बसले. ज्योतीआजी मुद्दामून साडी नेसून- नटून थटून त्यांच्या स्वागताला हजर होती.

सनईचे सूर आसमंतात निनादत होते.

गोलाच्या मध्यभागी तिन रांगोळी घातली. त्यावर समई नी पणत्या, तेजाळत होत्या. एकुलता एक आकाशकंदील जवळच्या झाडावर लटकत होता. तिन सर्वाना नमस्कार करून अभिवादन केले. नी बोलायला सुरुवात केली...

"दिवाळीचा खरा अर्थ म्हणजे मनातला नैराष्य-अंध:कारावर आत्मज्योतीचा उजाळा द्यायचा"... नी त्याचबरोबर तिन दिवाळीच्या चार दिवसांचे महत्व सांगितल.

भाऊबीज हा भावाबहिणीचा खास सण फक्त भारतातच साजरा केला जातो ते नमूद केल.

नी मग तिच्या मते लक्ष्मीचा जो खरा अर्थ, की

जे जे काही श्रेयस आपल्याकडे आहे- उत्तम प्रकृती, चांगले शिक्षण, जॉब, तसच कुटुंब आणि मित्र, तुमच्या सारखे प्रेमळ शेजारी पाजारीही त्यात आलेच – तीच खरी लक्ष्मी, नी तीच पूजन कां करायचे ते सांगितल.

व्हाईस प्रेसिडेंटचा उल्लेख न करता, कुठचीही राजकीय मत न मांडता तिच्या आईच नांव कमला म्हणजे लक्ष्मी हेही त्यांना सांगितल.

बराच वेळ गप्पा रंगल्या होत्या. लगेच Veteran's day येणार होता. नी त्यांच्या वसाहतीत खूप शूर जवान होते, त्यांचाही तीने गौरव केला. बरेच

स्वयंसेवक काम करत. त्या सर्वांना वाखाणले. त्याचं दिवशी योगायोगाने अमेरिकेत येऊन आजीला 53 वर्ष झाली होती. तिच्या अमेरिकेतील प्रथम दिनाची कथा सांगितली. अमेरिका माउलीन दत्तक घेतले, नी खूप काही दिल. म्हणून तिन वाकून भूमीला नमस्कार केला. म्हणाली आतां तुमची कहाणी ऐकवा

मग बऱ्याच जणांनी त्यांचेही पूर्वज कसे नी कुठून आले नी अमेरिकन आईच्या कुशीत सामावले याच्या कहाण्या सांगितल्या. शेवटी आजीनी गर्बा नी भांगडा डान्सने सर्व जनतेला त्या माहोल मध्ये सामील केले.

जवळ जवळ 3 तास ही दिवाळीची पार्टी चालली होती. दिवाळीच्या सणात सामावून घेतले म्हणून सर्वाना फार आनंद झाला होता. नी प्रत्येकाने आवर्जून घरी जातांना सांगितल की their life was enriched today! तोंड गोड करण्यासाठी आजीनी टोपलीभर च्याप क्यांडीज वाटल्या.

लाडू चकली शिवाय दिवाळी अशी ही साठा उत्तराची सत्य कहाणी, पाचा उत्तरी सुफळसंपूर्ण होवो. नी दिवाळीदेवी तुमच्या मनात नी घरांत सतत नांदो.

|| न्यू इंग्लंड मराठी मंडळ ||
NEW ENGLAND MARATHI MANDAL

Looking for a Graphic Designer

Good Volunteering oppourtunity at NEMM.

Graphic Designer Needed for Anubandh Magazine.
Please contact: registration@nemm.org

Students can apply.
Students Volunteering hours will be recognized by NEMM.

कोविड - एक अनुभव

लेखकः डॉ. डी. आर. डोके

आमचा ज्येष्ठ नागरिकांचा, कोरेगांव पार्क पुणे येथे हास्य क्लब आहे. हा क्लब कोरेगांव येथील बागेमध्ये सकाळी ६. ४५ ते ८ वाजेपर्यंत असतो. ह्यामध्ये ह्रिदय गती, श्वासोच्वास वाढविणारे व्यायाम प्रकार असतात.

त्यानंतर उभे राहून करण्यायोग्य असे ताडासन, त्रिकोणासन व इतर आसनप्रकार असतात , जेणेकरून शरीराच्या सर्व अवयवांना, डोळ्यांसहित व्यायाम मिळेल असे व्यायाम प्रकार असतात.

तिसरा भाग असतो हास्याचा, ज्यामध्ये वेगवेगळे हावभाव व चुटके असतात ज्यामुळे हास्य उस्फुर्तपणे बाहेर पडते. मेंदू मध्ये आनंद, सुख-समाधान, प्रेम निर्माण करणारे नुरोट्रान्समीटर्स ऍक्टिव्ह होऊन त्यामधून आनंद निर्माण होतो. थोड्याशा विश्रांती नानंतरचा भाग असतो प्राणायामाचा, ज्यामुळे आपल्यामधील प्राणशक्तीचे संतुलन राखणे शक्य होते, तसेच डाव्या या उजव्या मेंदूमध्ये संतुलन राहण्यास मदत होते. दिवसभरातील घटनांना सामोरे जातांना समतोलपने विचार करणे शक्य होते.

सरते शेवटी ओंकार नादाने सुरुवात करून १०-१५ मिनिटांचे ध्यान केले जाते आणि शेवटी वैश्विक प्रार्थना होते. असा हा आमचा हास्यकलुब ह्या नावाने चालविला जाणारा रवांगीण योग्य प्रकारचं म्हणायला हवा.

असे सर्व प्रकारचे सुखी व समाधानी आयुष्य जगात असतांना covid नावाचे संकट ध्यानीमनी नसतांना अचानक येऊन धडकले. साधारण २०१९ च्या फेब्रुवारी महिन्यामध्ये त्याची सुरुवात महाराष्ट्रातूनच झाली. दुबई वरून हवाईमार्गे आलेल्या कोविड ग्रस्त इसमाने, भारतातील कोविड -१९ च्या साथीला गती दिली. ज्या टॅक्सिने तो पुण्याला आला, त्या टॅक्सिचा ड्राइवर व टॅक्सितील इतर प्रवासी यांना कोविड ची लागण झाली. हा आमच्या साथरोग यंत्रणेला बसलेला धक्का होता, परंतु तो लवकर लक्षात आला नाही.

पुण्यासोबतच मग सातारा, सांगली व आजूबाजूचे इतर शहरी व ग्रामीण भाग बाधित होऊ लागली. रुग्णसंख्या झपाट्याने वाढू लागली कारण हा रोग हवेतून पसरणाऱ्या सुक्ष्म जलबिंदूत असणाऱ्या विषाणू मधून पसरतो त्यातच आपसातील संपर्क टाळण्याची व योग्य ती काळजी घेण्याचे ज्ञान आणि साधने लवकर उपलब्ध होऊ शकली नाही. रुग्णसंख्या हजारोंच्या घरात उत्तरोत्तर वाढत गेलीं. महाराष्ट्र हे देशात प्रगत राज्य असल्यामुळे इथे इतर राज्यातील कामगारांची संख्या खूप अधिक आहे व त्यांचे जाणे-येणे नेहमी चालू असते, आणि जसजसे इतर राज्यातील लोक बाधित होऊन ही साथ ते आपापल्या राज्यात घेऊन जाऊ लागले. हळूहळू अशाप्रकारे कोविड संपूर्ण देशात पसरला.शासन जागे होईपर्यंत परिस्थिती बऱ्यापैकी नियंत्रणाबाहेर गेलेली होती. त्याचबरोबर प्रसाराला आळा घालण्यासाठी कोणकोणते उपाय करावे याची निश्चित माहिती उपलब्ध नव्हती.

लोकांनी आपल्या इतर सर्व समस्या बाजूला ठेऊन, साथरोगावर नियंत्रण मिळवण्यासाठी एकत्रितपणे काम करावे यासाठी भावनिक आव्हाने केली जाऊ लागली, जसे कि सर्वानी विशिष्ट दिवशी विशिष्ट वेळी दिवे लावावे, थाळ्या वाजवाव्यात वगैरे. या सर्व कृती भावनेला हात घालणाऱ्या पण वैज्ञानिक दृष्ट्या हास्यास्पद होत्या, पण त्यामध्ये शासनाच्या

निर्णयात लोक सहभाग मात्र निश्चितपणे वाढीला लागला.

महाराष्ट्र शासनाने मात्र लगेच डॉ संजय ओक ह्या ज्येष्ठ व अनुभवी शास्त्रज्ञाच्या अध्यक्षतेखाली ६-७ एक्स्पर्ट डॉक्टरांची एक सुकाणू समिती स्थापण केली. त्यांच्या सूचनेनुसार सोशल डिस्टंसिन्ग पाळणे, मास्क बंधने, ज्या भागात रुग्ण आढळून आले, तेथील रहदारी बंद करणे. रुग्णाच्या संपर्कात आलेल्यांची वैद्यकीय तपासणी करणे, त्यांना योग्य मार्गदर्शन करून गरज भासल्यास औषधोपचार करणे, अशाप्रकारची उपाययोजना लागू करण्यात आली. पहिले बरेच दिवस, निश्चित औषधोपचार माहिती नव्हता, जसजशी तक्रारी आणि निदाने होत गेली तसतशी पूर्वानुभवानुसार औषधीपचार सुरु करण्यात आले.

जागतिक आरोग्य संघटना, केंद्रीय आरोग्य संघटना व महाराष्ट्रातील सुकाणू समितीच्या सूचनांचा एकत्रित विचार करून, हळूहळू उपचारात सुधारणा होत गेली. रस्त्याने जाणाऱ्या येणाऱ्यांच्या हालचालीवर बंधने आली, जमावबंदीचे आदेश शहरोशहरी घोषित केले गेले. गर्दीने गजबजून जाणारे रस्ते ओस पडू लागली, सगळीकडे भयाण शांतता पसरली, लोकांमध्ये अधिकच नकारात्मक, भयावह परिस्थिती झपाट्याने पसरली.

महाराष्ट्रात औद्योगिकरण, शहरीकरण इतर राज्यांच्या मानाने अधिक असल्यामुळे इथे परराज्यातून आलेले आणि छोटे खाण्याचे स्टॉल्स चालविणारे लोक हवालदिल झाले कारण कुणी बाहेरच पडत नसल्यामुळे त्यांचे धंदे बंद पडण्याची वेळ आली. बरेच इतरही उद्योगधंदे बंद करावे लागले. गर्दी टाळण्याकरता सर्वात प्रथम गदा आली ती केशकर्तनालयांवर. या सर्वाचा एकत्रित परिणाम म्हणून लोक मोठ्या प्रमाणावर बेरोजगार झाले व त्यांचे खाण्यापिण्याचे हाल होऊ लागले. करोना कधी कुणाला बाधित करेल याची शास्वती नसल्याने परराज्यातून आलेले मजूर भयभीत झाले, त्यांनी आपआपल्या राज्यात परत जाण्याची तयारी सुरु केली.

त्यातच शासनाने एकाएकी सर्व प्रवासावर बंदी लादली, त्यामुळे लोक आणखीच सैरभैर झाले व मिळेल त्या वाहनांनी प्रवास करण्याचा प्रयत्न करू लागले, जेंव्हा वाहने मिळणे देखील बंद झाली तेंव्हा बऱ्याच जणांनी पायी चालत जाण्याचा पर्याय निवडला, त्यामध्ये बऱ्याच जनांचा मृत्यू झाला. घरातील सर्व कुटुंबीय बिनकामी होऊन घरातच डांबून राहिली. भीतीचे चिंतेचे निराशेचे वातावरण सर्वांनाच भेडसावू लागले त्यात बऱ्याच जणांचे मानसिक संतुलन बिघडले. घराघरात कुटुंबीयांमध्ये वितुष्ट वादविवाद निर्माण होऊ लागले व त्यामुळे कौटुंबिक स्वास्थ्य बिघडू लागले. असाही एक अहवाल आहे कि, कोविड च्या मृत्युसंख्येपेक्षा, ह्या काळात आत्महत्येचे मृत्यू अधिक झाले.

रुग्णसंख्या वाढतच होती, मे २०२० च्या दरम्यान, रुग्णसंख्येने पहिला उचांक २०००० च्या वर जाऊन गाठला. सर्व शासकीय यंत्रणेवर जसे कि पोलीस, रेव्हेन्यू, व मुख्य म्हणजे आरोग्य यंत्रणेवर खूप ताण येऊ लागला. महाराष्ट्रातील सुकाणू समितीने रोगप्रसाराला आळा घालण्यासाठी सोशल डिस्टंसिन्ग, दुकानात खरेदी करण्याकरिता वेळ ठरूवून देणे व तिथे देखील सोशल डिस्टंसिन्ग पाळणे या व इतर गोष्टी आमलात आणावयास सुरुवात केली. फेब्रुवारी मार्च २०२१ पर्यंत बऱ्याच कारणाने लस उपलब्ध होऊ शकली नाहि. जसजशी रुग्णसंख्या

वाढत गेली, तसतशी औषधांची ऑक्सिजन ची, रुग्णालयातील खाटांची संख्या कमी पडायला लागली, त्यामुळे मग केंद्र सरकार, जागतिक आरोग्य संघटना व इतर सामाजिक संस्थांची मदत घेण्यात आली. शाळा कॉलेजेस ना सुट्ट्या देऊन त्या इमारतींमध्ये तात्पुरते दवाखाने निर्माण केले गेले. स्टाफ ची कमतरता पडू नये म्हणून खासगी हॉस्पिटल्स, वैद्यकीय विद्यार्थी, नर्सेस यांची मदत घेण्यात आली. हे सर्व करूनही एकूण रुग्ण संख्या पाहता बऱ्याच जणांना ऑक्सिजन न मिळाल्यामुळे तर कधी हॉस्पिटल मध्ये जागा ना मिळाल्यामुळे आपले प्राण गमवावे लागले.

सप्टेंबर २०२० मध्ये दुसरा रुग्णसंख्येचं उचांक गाठला गेला व त्यानंतर जानेवारी २०२१ मध्ये तिसरा उचांक गाठला गेला.

फेब्रुवारी मार्च २०२१ नंतर हळूहळू कोविशील्ड, कोवॅक्सिन च्या लस उपलब्ध होऊ लागल्या. सर्वात प्रथम वैद्यकीय यंत्रणेमध्ये काम करणार्यांना लस देण्यात आली, त्यानंतर ६० वर्षावरील नागरिकांना व मग इतरांना लस देण्याचे ठरवण्यात आले.

मी स्वतः १९ एप्रिल २०२१ ला पहिली मात्र घेतली. हळूहळू वॅक्सिनेशन चा वेग वाढविण्यात आला व सोशल डिस्टंसिन्ग मास्क वगैरे गोष्टी चालूच होत्या, या सर्वच एकत्रित परिणाम म्हणून जून जुलै २०२१ पासून हळूहळू रुग्णसंख्या आटोक्यात येऊ लागली.

महाराष्ट्रात सर्वात जास्त रुग्णसंख्या ८० लाख १२ हजार व मृत्यू १, ४८०००, राज्य शासनाच्या आकडेवारीनुसार झाले आहेत. महाराष्ट्राची एकूण लोक संख्या ११ कोटींच्या घरात आहे त्यानुसार रुग्णांचे प्रमाण लोक संख्येच्या ७% तर मृत्यूचे प्रमाण १.८२% इतके आहे. केरळची लोक संख्या साडेतीन कोटी असूनही तेथील रुग्णसंख्या महाराष्ट्राच्या खालोखाल म्हणजे ६८ लाख तर मृत्य ७ लाख १२००० इतके आहेत. महाराष्ट्रात परराज्यातून येणारांची संख्या अधिक असल्यामुळे इथे रुग्ण संख्या खूप होती तसेच केरळ य या राज्यामध्ये परदेशात काम करणाऱ्यांची संख्या अधिक असल्यामुळे तिथे रुग्णप्रमाणं आणि मृत्युप्रमाणंही अधिक आढळले. याचे एक कारण असेही आसु शकते कि ह्या दोन्ही राज्यात केस डिटेक्शन आणि रिपोर्टींग, माझ्या माहितीनुसार चांगले आहे.

शासकीय स्तरावर भारतात सार्वजनिक आरोग्य व्यवस्था, प्रतिबंधात्मक उपाययोजना बळकट करण्याच्या उद्देशाने करण्यात आली. उदा. परिसर स्वछता, वैयक्तिक स्वछता आणि प्रतिबंधात्मक उपाययोजना, टीबी, स्मालपॉक्स, मिजल्स, इत्यादी संसर्गजन्य रोगांकरता लसीकरण. ह्या सर्व उपाययोजना राबविण्याकरता, जिल्हा रुग्णालयापासून, तालुका रुग्णालये, प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्रे उपलब्ध करून देण्यात आलेली आहेत. सध्या भारतात दार तीस हजार लोकसंख्येला एक प्राथमिक आरोग्य केंद्र व पाच हजार लोकसंख्येला एक उपकेंद्र उपलब्ध आहे.

प्रत्येक प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये, दोन डॉक्टर्स, नर्सिंग स्टाफ, सॅनिटरी इन्स्पेक्टर आणि सहा ते सात सहाय्यक आरोग्य कर्मचारी उपलब्ध आहेत. त्या सर्वांच्या मार्फत प्रतिबंधात्मक उपाययोजना केली जाते. हि सगळी यंत्रणा मजबूतपणे उभी असल्यामुळे आपल्याकडे कोविड लसीकरणाची योजना प्रभावीपणे राबविण्यात आली. इतर लसीकरण योजनांमुळे जनजागृती आधीच झालेली होती, लोकांनीही लसीकरण ऊस्फूर्तपणे स्वीकारले. देशात २१८ कोटी,

८३ लाख ४३ हजार या ३१६ डोसेज देण्यात आले आणि महाराष्ट्रात ५ कोटी ७३ लाख ५७ हजार ७०० डोसेज देण्यात आले.

शासनाच्या अखत्यारीत, आरोग्ययोजना भक्कम अशी उभारण्यात आल्यामुळे कोविड १९ च्या साथीला समर्थपणे सामोरे जाता आले. म्हणूनच सार्वजनिक आरोग्ययोजनेकडे दुर्लक्ष होऊ नये असेच सर्व साथ रोग नियंत्रकांचे मत आहे. ही बाब ठळकपणे या साठी मंडली, कारण सध्या सगळीकडे खाजगीकरणाचे वातावरण पसरत आहे, त्याचा दुष्परिणाम भविष्यकालीन साथरोग नियंत्रणावर होऊ शकतो. विषाणू रोगांचे प्रमाण उत्तरोत्तर पर्यावरण विध्वंसामुळे वाढतच जाईल असे भाकीत आहे.

मुख्यमंत्री, आरोग्यमंत्री व डॉक्टर संजय ओक ह्यांच्या अध्यक्षतेखालील कोविद नियंत्रक सुकाणू समिती, आरोग्य यंत्रणेतील सर्व आरोग्य कर्मचारी, प्रायव्हेट हॉस्पिटल्स, आणि सर्व डॉक्टर्स यांच्या सहभागाने महाराष्ट्रात प्रभावीपणे साथीला रोखण्यात यश आले.

Life of a Public-School Teacher during Pandemic - resilience, resilience, resilience!

- समिधा साने

Welcoming students this year in September was enchanting; after all, we were seeing all our students, about 1600 of them, in-person on day one of school after two plus years. The feeling of 'everything back to normal' is good, even though we have a new normal because of all the learning that happened during the pandemic.

Last academic year (2021-22), we started the school year ready to "pull the plug" and go back to hybrid when needed; class sizes and configurations were kept accordingly. Even though cleaning of desks and sanitizing everything became thing of the past, projecting voice through the masks & partitions in science/engineering classrooms, which is what I teach, remained for at least half of the academic year. Anxiety over weekly reports of rising COVID cases at the school and contact tracing went on for most of the school year. Data showed many student behavior problems across the board. It was as if students forgot how to behave in a social/school setting. It felt like a soda bottle that was violently shaken and then let out. Student had lots of learning gaps making it difficult to teach grade level content especially in cumulative subjects where new knowledge is built on what came before.

The year before (2020-21), as the pandemic was raging, many public schools embraced a hybrid model in which at a time half the students worked form home, and half were in the classroom. Nevertheless, teachers were required to keep both sets of students engaged and moving forward in the curriculum. This was not only challenging but also required twice as much prep work on part of the teachers. Teachers needed to adapt their practices and be creative to keep students engaged as every household had become a classroom - more often than not - without an environment that supports learning. Not only teachers but students also had to adapt to new learning styles. One-on-one, small group and definitely in-person education promotes better engagement. Self-directed learning is not for all.

It all began in Mid-March of 2020 when we were told to go home and were not allowed to enter the school building without having to jump through hoops. We were eventually allowed very limited access to grab the essentials for this unique spring semester of 2020. We had to go digital! This meant self-teaching new technology that would engage students, converting all the curriculum resources to digital ones, and paying for engaging digital resources from our pockets. All this went on while there was opposition to paying public school teachers because "we were not at school". We even heard comments like, "so what they have to pay for the resources, they are home and don't have to pay for the gas to drive to school". In spite of all the hard work and teachers' best

intentions; there were disparities in student's access of technology and inability to engage many students via virtual learning environments. On top of that, schools adopted a no grading policy to provision for students who may not have conducive learning environment outside of school. With the implementation of this policy, there was very little incentive for the students to complete any assignment.

Teaching profession is inherently a social one, which involves interacting with students and their parents and keeping the relationships going on. This meant creating new communication channels through which we would very likely engage with students and families. As families faced new hardships teachers and the schools had to take on the role of foundational point for resource for any type of support the family needed.

Social support and collaboration is an important resource for teachers that can buffer the frustrating effects of job demands. Not being able to have quick corridor conversations and lunchtime breaks in staff rooms with other teachers was yet another toll-taking event for many teachers. Also, many teachers had to work with new co-workers who were temporarily moved to a school because some teachers could not be present at school in person due personal or family health issues. This resulted in change of teaching assignments for teachers compelling them to work at a different school and outside their comfort zone in addition to other demands brought about by the pandemic. These working 'from home' teachers worked online with students who opted to stay at home.

With a pressing need to respond rapidly to the ever- changing pandemic, governments have had to make difficult decisions quickly which would directly affect schools and hence teachers. After governors address, we would get an email as per the new directive from the department of education and would have to change our plans accordingly. We were totally at the whims of the political climate for our routine school matters as well for receiving vaccines.

We have learnt a lot and come ahead in many ways during these unprecedented times and going back to absolute old ways seems wrong. This academic year seems like a new beginning as we try to blend best of both worlds – the world before and after pandemic.

कथा

चिमनलाल

- श्रीनिवास जांभेकर

आमची हि, आणि लेक केन्टच्या महागड्या सलोन मध्ये (त्याचा उच्चार सलॉ असा फ्रेंचमध्ये बोलल्यासारखा करायचा) जाऊन दोन महिन्यातून एकदा केसांची मशागत करून येतात . मशागत हा शब्द मी मुद्दाम वापरतो कारण त्यात केस कापण्याच्या प्रक्रियेबरोबर , ते केस धुवून त्यांना चांदीच्या कागदात गुंडाळून हेल्मेट सदृश एक हॅट डोक्यावर ठेऊन त्यातील दिव्याने वाळवणं , त्यांना खास पद्धतीचं वळण लावणं , किंचीत तांबड्या करड्या रंगांच्या बटा रंगवणं ,ह्या क्रिया अंतर्भूत असतात . बहुधा त्या दोघी नेहमी बरोबर जातात पण गेल्या खेपेला लेक बरोबर नसल्यामुळे मी हिचा शोफर म्हणून गेलो होतो. तरणाबांड केंट, सिनेमातला हिरो शोभेल असा हेअर स्टायलिस्ट. नाजूक हाताने केसांची सफाई करणारा केंट, खास मित्र असल्यासारखा विविध विषयांवर गप्पा मारत होता. ते पाहत असताना मला माझा बालपणाचा केश कर्तनालयाचा अनुभव सरर्कन चित्रपटासारखा समोर उभा राहिला .

अगदी लहान असताना म्हणजे साधारण प्राथमिक शाळेत शिकत असेपर्यंत केस कापण्याचा कार्यक्रम घरच्या घरी होत असे. आमच्या सोसायटीत अंबालाल नावाचा न्हावी घरोघरी जाऊन केस कापत असे. पांढरा सदरा, पांढरं धोतर , आणि पांढरी टोपी आणि चेहेऱ्यावर निष्पाप हास्य. ठरवलेल्या दिवशी तो घरी येई . एकाच दिवशी बाबा , मोठा भाऊ , आणि मी सगळ्यांचा केस कर्तनाचा कार्यक्रम उरकला जाई. जुनं वर्तमानपत्र अंथरून त्यावर आम्ही बैठक मारत असू. अंबालालला एका वाटीत गरम पाणी दिले कि त्याच काम सुरु. आईच्या मार्गदर्शनाखाली आमचे केस कापले जात . म्हणजे अगदी बारीक. अंबालाल अबोल. डोक्याच्या खाली मानेवर त्याच मशीन शेतातला नांगर चालावा अस चालत असे आणि अगदी तुळतुळीत मान झाल्यावर थांबत असे . त्यावेळी मित्र पण त्या मानेवर "ताजी" म्हणून चापटी मारत .

प्राथमिक शाळेतून माध्यमिक शाळेत गेल्यावर चिमनलाल च्या डिलक्स सलून मध्ये जायच प्रमोशन मिळालं. अंबालाल पेटी घेऊन फिरणारा मोबाईल न्हावी. तर चिमनलालच खुर्ची आरसा असलेलं सुशोभित सलून . चिमनलालच व्यक्तिमत्व अंबालाल च्या अगदी उलट. वाचाळ. दिल्लीच्या राजकारणापासून ते अमेरिकेच्या वॉशिंग्टन पर्यंत त्याच अगाध ज्ञान त्याच्या गिर्हाईकांना श्रवण करावं लागे. त्याच्या दुकानांत गिऱ्हाकांपेक्षा तेथील वर्तमानपत्र वाचणाऱ्यां फुकट्यांची गर्दी जास्त असे.

चिमनलाल सगळ्यांचा म्होरक्या. सगळ्या सत्ताधार्यांना (तेव्हां कॉंग्रेसची सत्ता होती .,चिमनलाल जनसंघाचा) आणि त्यांच्या चुकीच्या राजकारणावर टिकास्त्र सोडण्यात आणि सल्ला देण्यात त्याच्या हातातल्या कात्रीपेक्षा तोंडाचा पट्टा जास्त जोरात चालत असे. मला भिती वाटायची कि हा जोशात येऊन कात्रीने केसाऐवजी चुकून कान कापतो कि काय? पानाची पिचकारी दुकानाबाहेर

थुंकत तो राजकारण्यांना सणकून शिवी हासडत असे .

चिमनलालकडे जायला मला आवडायचं ते दोन कारणांसाठी . त्याच्याकडे बसायला मस्त डनलॉपची ऐसपैस खुर्ची आणि समोर मोठा आरसा असे. त्याहीपेक्षा त्याच्याकडे stardust, filmfare, star & style सारखी वाचायला आवडणारी आणि घरी न आणता येणारी मासिकं वाचायला मिळत. त्यातील धरमेन्द्र देवानंद , दिलीपकुमार यांचे फोटो पहाण्यात मजा वाटे ती त्यांच्या हेअरस्टाईल्ससाठी. हिरॉईन्सचे फोटो पहाण्याच आकर्षण नव्हत असं नाही . पण कुणाही हिरोईन् वर जीव ओवाळून टाकावा एवढं वय पण मोठं झाल नव्हतं. अजून शाळेत जाणारा चड्डीबहाद्दर होतो.

मला धरमेन्द्र ची हेअरस्टाईल अतिशय आवडायची. त्याच्यासारखा भांग पाडण्याचे माझे आटोकाट प्रयत्न चालायचे पण मेले माझे केस कधी सहकार्य करीत नसतं.

एकदा मी धीर करून चिमनला म्हटलं होतं "चिमनभाई मारे धर्मेंद्र कट जोईए.".

" हा हा धमेंद्र , देवानंद जे जोईए ऐवा कापी आपिश तू चिंता ना कर" उति चिमन चिमनच उत्तर कधी नकारात्मक नसे.

तो त्याची कात्री, मशीन आणि वस्त्रयाने त्याच्या ठराविक पद्धतीनेच केस कापी. त्यात मला कधीही धरमेन्द्र कट दिसला नाही कि देवानंदचा फुगा.

त्याकाळी हेअर स्टाईल चे ट्रेनिंग देणार्या शाळा पण नव्हत्या आणि आत्तासारखी साधनं आणि आलिशान हेअर सलॉन्स हि नव्हती.

एक गोष्ट मला आवडायची , डोक्यावर केस भरपूर होते आणि ते चिमन तल्लीन होऊन त्याच्या राजकीय कॅमेन्टरीवर कापताना त्याला अजिबात घाई नसे. त्याशिवाय त्याच्या रेडियोवर विविध भारती , रेडियो सिलोन सारख्या स्टेशनस वर मनपसंत सिनेमांची गाणी चालू असत. मग काय हवय?

मी त्यात एक मस्त डुलकी काढायचो. चिमनने माझ्या अंगावरचा पांढरा शुभ्र टॉवेल काढून "चल उठ हवे" म्हटल कि मी जागा होई. आणि थोड्या नाखुशीनेच उठत असे. चांगला एक तास मजेत जाई.

एक गम्मत नमूद करावीशी वाटते.केस कापून घरी गेलो कि आई माझ्या केसांचं बारकाईने निरीक्षण करून म्हणायची " केस नीट कापले नाहीत अजून लहान करून ये" मी आज्ञेचं पालन करून परत चिमनच्या पुढ्यात हजर . चिमनपण न रागावता म्हणे "चल बेस कुर्सीपर " आणि अजून थोडा केशसांभार कमी करत असे. अधिक आकार न घेतां .

चिमन जनसंघाचा सक्रिय कार्यकर्ता होता. त्यांच्या सभा मोर्चांमधून तो सक्रिय भाग घेत असे. चिमनच बोलणं अगदी अस्खलित आणि वागण घरंदाज माणसांसारख होत. पक्षाचा कार्यकर्ता म्हणून काम करताना सेवांभाव त्याच्या वागण्या बोलण्यातून ओतप्रोत भरलेला दिसून येई. त्याच्या चेहर्यावर कधीही चिंतेच्या आठ्या मी पाहिल्या नाहीत. त्याची हसतमुख मूर्ती आजही डोळ्यापुढे तशीच उभी आहे.

आमच बालपण साध होत पण ते समृद्ध करणारी अंबालाल चिमनलाल सारखी मंडळी आयुष्यात आली आणि कायमची लक्षात राहिली.

" चल निघू या" हि म्हणाली आणि मी भानावर आलो. केन्टला पैसे देताना "केसाने खिसा कापला" असे मनातल्या मनात म्हणत मी केन्टच्या दुकानातून बाहेर पडलो.

गृहीत

- भास्कर पवार भारंप

दुपारी दोन वाजले असावेत. मोबाईल ची रिंग वाजली, पलिकडुन आवाज आला 'काय चाललय आराम का? बऱ्याच दिवसांत फोन नाही गाठभेट नाही विसरलात का' 'एकाच दमात अनेक प्रश्न विचारले गेले. आवाज ओळखीचा वाटला नाही. पण प्रतिप्रश्न करुन आपण कोण बोलताय हे विचारायला संकोच वाटु लागला "नाही ना ओळखलं, नाहीच ओळखणार तुम्ही आम्हाला" पलिकडुन पुन्हा वन वे बोलण सुरु..... 'अहो मी पद्माकर बोलतो, आतातरी ओळखलं का? आपण बंडीच्या लग्नाच्या वेळी भेटलो होतो. जेवायला शेजारी शेजारी बसलो होतो.. आठवले कां?' मला तर काहीच आठवत नव्हते कोण पद्माकर कोण बंडी..... पण अगदिच विसराळू ठरू नये म्हणून मी घाईने हो हो ओळखले ओळखले सांगीतले व सुटलो बुवा म्हणून निश्वास टाकला पण तो अल्पावधीत असफल ठरला."सांगा बर मला काय म्हणत लहानपणी " पलिकडुन दणका.. काय सांगावे बरं... काही तरी उत्तर देणे भाग होते. 'अरे बंड्या ना तुम्ही ' मी पण ठोकितो ऐसाजी कि धिटाई केली, समोरच्यांची प्रतिक्रिया काय येते याची प्रतीक्षा करावी लागलीच नाही. खो खो चा स्फोट झाला. "वा वा काय तुमची स्मरणशक्ती माझं टोपणनावही लक्षांत आहे तर तुमच्या." तर मी काय सांगत होतो आमचे सासरे सदाशिव जोशी हे उध्या पुण्यात येत आहे. त्यांना थोडी मदत हवी आहे. आपण त्यांना नक्की मदत कराल अशी आशा आहे. त्यांचे काय काम आहे ते आपल्याला समक्षच सांगतील. असो मी फोन ठेवतो." अन फोन बंद झाला. आता मी खरोखरच निश्वास टाकला. पण फोन कोणाचा होता शेवट पर्यंत कळले नाहीच.

दुसऱ्या दिवशी मी हा फोन चा सर्व विषय संपुर्णपणे विसरून गेलो.

दुपारी चार वाजतां घरा बाहेर रिक्षा थांबल्याचा आवाज आला.

कोणीतरी ग्रहस्थाचे व रिक्षा चालकाचे जोरात बोलणे ऐकु आले. रिक्षाचालकाकडे पैसे सुटे नसल्याचे व त्या ग्रहस्थाकडे पांचशेची नोट असल्याचे साधारण पणे त्यांचा संभाषणाचा विषय होता. थोड्यावेळांत दरवाजाची बेल वाजली. दारांत पंचावन्न ते साठ वयाचे एक उंच, झुपकेदार मिशा असलेले शर्ट व धोतर पेहेराव केलेले ग्रहस्थ उभे होते.

"नमस्कार मी सदाशिव जोशी, पद्माकर कुलकर्णी मनमाड यांचा सासरा. आपणांस काल त्यांनी फोन केला होता."

'हो हो केला होता फोन ' मी तुटक तुटक उत्तर दिले. असं करा पांचसेचे सुटे द्या '. "सुटे नाही माझ्या जवळ "मी झटकायचा प्रयत्न केला.' 'बरं मग १७८रु द्या त्या रिक्षाचालकाला मी सुटेकरुन देतो तुमचे' 'आता पळवाटा बंद झालेल्या दिसल्या. पाकिटातून १८० ₹काढुन दिले. तोपर्यंत सदाशिवराव सोप्यावर स्थिरावले. सौ ने पाणी आणुन दिले तांब्या तोंडाला लावुन घटघटा पाणी पिऊन मिशांवरील पाणी हाताने पुसत "मला थोडा गोड चहा पण भरपुर लागतो" किचनकडे पहात सदाशिवराव पहाडी स्वरात वदते झाले ".

मी आपला बापडा खुर्चीवर बसून हे सारे बघत होतो. सौ ने तत्परतेने तीन कप चहा आणला. एक कप माझ्या हातात देऊन दोन कप सदाशिव रावांच्या पुढ्यात टिपायवर ठेवले. एका मागोमाग एक करीत दोन्ही कपचहा चविणे फुरक्या मारत संपवून सदाशिवराव उठले, बॅगेतुन पंचा व स्नानाचे कपडे घेत " राजे कुठे आहे बाथरूम मी स्नान केल्याशिवाय काहीच करत नाही प्रथम स्नान" मी भानावर आलो मलाच राजे संबोधतीत होते ते..... मी झटकन उठुन याना याना म्हणत त्यांना आंत नेऊन बाथरूम दाखवून गरम गार पाण्याचे नळ दाखवुन, थोडे मार्गदर्शन करुन बाहेर आलो.

मधल्या घरांत आई, पत्नी, दोघंमुलं दबा धरून माझी वाटच पाहत होते." कोण हो हे पाहुणे "सौ चा पहिला प्रश्न उत्तरासाठी तोंड उघडले पण काय सांगणार नक्की कोण. "अग माझ्या मित्राचे सासरे" कोण मित्र दुसरा प्रश्न जुळ्या भावासारखा पुढे आला "अग तो बंड्या" कालच्या फोन चा संदर्भ आठवत मी बोलुन गेलो.." बाबा त्या आजोबांच्या मिशा फारच लफ्फेदार आहेत ना" मंदार वदला चिरंजीवांच्या निरिक्षण शक्तीचा प्रत्यय आलाच. "सदाशिव पेशवेच दिसतांत जसे "कन्या रत्नाची मुक्ताफळे. आई ने मात्र "अतिथीदेवो भव" बरं भास्करा असु दे असु दे 'म्हंटले मला जरा धिर आला.

मी थोडा स्थिर झालो कालच्या फोन चा विचार करू लागलो.. थोडे थोडे स्मरण होऊ लागले दोन वर्षे झाली असतील एका लग्नांच्या समारंभात जेवणाच्या पंगतीत एक पन्नासीचे ग्रहस्थ शेजारी बसले होते. सहज म्हणून बोलणे झाले.
जेवत असताना येणाऱ्या प्रत्येक वाढप्याला 'अरे साहेबांना वाढ... जिलेबी वाढ असा अग्रह चालला होता त्याचा. मला पंगतीत खुप संकोच वाटतो पण शेजारच्या त्या ग्रहस्थाने आग्रह करुन करून मला पोटभर खायला लावले. मी ही त्यांना आग्रह केला. पानाचाविडा घेतांना थोडी जुजबी माहितीची देवाणघेवाण झाली. मी त्यांना विचारले मला जेवताना का आग्रह करत होता हो असे विचारले त्यावर त्यांनी सांगितले "अहो पंगतीत मागायला लाज वाटते म्हणुन शेजारच्या ला आग्रह करायचा मग तोही आपल्याला आग्रह करतो." त्याचे हे आग्रहशास्त्र सडेतोड असले तरी माझ्या पचन पडले नव्हते.. त्यानंतर फोन नंबर ची देवाण घेवाण झाली. माझा पत्ता त्यांनी काळजीपूर्वक टीपुन घेतला होता.
एकंदरीत आता थोडं तरी कोडे उलगडले होते. पण या जुजबी ओळखीमधुन स्वतः च्या सासऱ्यांना थेट घरी पाठविणे जरा जास्तच होतंय असं वाटुन गेलं.

सदाशिवरावांची आंघोळ आटोपली. "मला जेवायला अगदी साधं विना तिखट लागते. भाजी कोणत्याही चालते" स्पष्ट पणे मेनु ऐकवला गेला. पुन्हा एकदा चहा झाला. मुलांना समोर बोलावून काय शिकता, व्यायाम करता कां, कुठलेखेळ खेळता. शुभंकरोती म्हणून दाखवा इ. इ. आजोबापण दाखवून झाले. जेवण चवीने जेवले. रात्री मुक्काला घरचा हॉलच पसंत असल्याचे त्यांनी सांगितले व हॉलमध्येच सोप्या वर झोपले.

दुसऱ्या दिवशी सकाळी लवकर उठून सदाशिव राव खड्या आवाजात अभंग म्हणत होते त्या आवाजाने मला जाग आली. सर्व ऐहिके उरकली, चहा नाष्टा आटोपला.
. "जरा माझ्या बरोबर येता का? "अशी विनंती सदाशिवरावांनी केली. मला सुटी होती मला नाही म्हणताच आले नाहीच. चला निघु या मी व सदाशिवराव रिक्षा करुन निघालो. एका मोठया हॉस्पिटल समोर जाऊन रिक्षा थांबली. "तुम्ही थांबा मी येतो आतुन"
सदाशिवराव म्हणाले व छोटी जडसी कातडी बॅग घेऊन घाईने आंत गेले. मी वेटिंगरुम मध्ये आरामात बसून राहिलो. कोणबरे आजारी असावे यांचे असा विचार करित किती वेळ गेला कळलेच नाही. दिडदोन तासानंतर सदाशिवराव आले. त्यांच्या बरोबर दहाबारा पुरुष, स्त्रीया, मुलं घोळक्याने आली. पुरुषमंडळींनी अत्यंत आदराने मला हात जोडून नमस्कार केले. सदाशिवरावांनी माझा परिचय करुन दिला. व माझा पत्ता ही दिला. सारा घोळका रिक्षा पर्यंत आम्हाला सोडवावयाला आला. आम्ही दोघे घरी आलो. "चला आता अतिथी जायेगे" असे म्हणत सदाशिवराव मोठ्याने हसत हसत म्हणाले.. हक्काने सौ कडे चहा मागीतला. सदाशिवरावांनी आई ना मात्र अगदी वाकुन नमस्कार केला. चहा घेऊन आमचा निरोप घेऊन ते रिक्षाने निघुन गेले.
दोन चार दिवसात आम्ही सारे सदाशिवरावांना विसरलो. नेहमीचे आयुष्य सुरु झाले.
साधारण दहा बारा दिवसांनी दुपारी एक पार्सल आले. कुणा कडुन आले हे पाहून ताब्यात घेतले. सदाशिवराव जोशी मनमाड. यांचे कडुन आले होते. पार्सल उघडले. आत दोन भरजरी साड्या, दोन शर्ट, पॅन्ट पिस, एक ड्रेस चे कापड, एक चिठ्ठी व एक चेक. चिठ्ठी त लिहिले होते
चि. भास्करा
अनोळखी माणसांसाठी तुमचे कुटुंब इतके झटले एका शब्दाने ही दुखविले नाही की चेहऱ्यावरील स्मित ढळु दिले नाही. रिक्षाचे भाडे ही परत मागितले नाही. मी आणी जावयाने आपणांस "गृहीत" धरले. पण आपण मात्र अतिथीदेवो भव"धर्म मनोभावे पाळला.
अतिथी म्हणून मी फुल ना फुलाची पाकळी पाठवीत आहे. मोकळ्या मनाने स्विकारावे.
सदाशिव.
चेक ची रक्कम बघुन डोळेच विस्फारले १८०००/_₹.प्रत्यय आला, एक दाणा पेरला की हजार दाणे उगवतात.
इतक्यात एक अनोळखी इसम दारांत आले" येऊ का आंत "चेहेरा ओळखीचा वाटला पण नक्की कोण. या या म्हणून त्यांना आंत घेतले. "आपली ओळख सदाशिवकाकांनी करुन दिली होती हॉस्पिटल मध्ये." संदर्भ लागला. ते सद्गृहस्थ पुढे म्हणाले" आम्ही निघतो आहोत मनमाड ला माझे वडिल आजारी होते त्या दिवशी तेथे हॉस्पिटला. हृदय शस्त्रक्रिया होती. हॉस्पिटल चे बील एकविस लाख भरायचे होते. ते सदाशिव काकांनी त्या दिवशी आणले होते ते त्यांनी भरले. शस्त्रक्रिया यशस्वी झाली. एका फोनवर काका स्वतः रोकड घेऊन आले. हॉटेलवर रहाणे सुरक्षित नव्हते, पद्माकरने आपले नांव सुचविले. म्हणून ते

आपल्या कडे रहायला आले होते. फार फार आभारी आहे आपला.

एका देव माणसाने आपल्याला "गृहीत" धरले याचा आनंद मात्र आयुष्य भर आनंद देत रहाणार आहे.

अनुभूती

- भास्कर पवार, पुणे

मी एक अतिशय सुंदर अनुभुती सांगणार आहे. मी अंधश्रद्धावान नाही. मला श्रवधेवर विश्रास आहे. दिनांक १६ एप्रिल २०२१ पासुन मला खोकला, सर्दी, कफ, दम लागणे प्रकार सुरू झाला. मुलीने, नातवाने त्वरीत तज्ञ डॉक्टर ची आॅन लाईन ट्रिटमेंट सुरू केली. दुसऱ्या दिवशी एम आर ए स्कॅन केले व लंग्ज ला व्हायरल असल्याचे दिसून आले.केस पाॅझिटिव्ह होती म्हणून त्वरित हॉस्पिटलमध्ये बेड मिळविण्याचा प्रयत्न जावई व नातु यांनी सुरू केले. तो पर्यंत oxi level ८८....९० पर्यंत खाली आलेली होती. नशीबाने भारती हाॅस्पिटल बिबवेवाडी येथे दोन तीन तासात बेड मीळाला. तातडीची मेडिकल ट्रिटमेंट सुरू झाली. कृत्रिम प्राणवायू त्वरीत लावला.

इंजेक्शन, गोळ्या, औषधे सुरु होती. किती काळ झोप, किती काळ स्वप्न पडत होती कळतच नव्हते. रात्रभर... पेशंट मामा... मावशी... सिस्टर.... ओरडत होते..... हा सगळा स्टाफ अखंड धावा धाव करीत होता... जाणवत होते. काय जेवतो आहे... काय खातो आहेकळत नव्हते. नातु व जावई भेटु शकत नव्हते.

शेवटी रात्री केंव्हा तरी स्टाफ ने माझा मोबाईल फोन आणुन दिला. नातवासी व जावयांसी बोललो. ते किती तांस ताटकळत होते कोण जाणे.

काय दिनचर्या चालु होती कळत नव्हते.

एक मात्र करीत होतो. सौ ने लावलेली युट्युब वर रामरक्षा पठण, मारोतीस्तोत्र, व

श्री स्वामी समर्थांचे निश्चित होई रे मना हे सकाळ व संध्याकाळ लावायचो. वार्डात दहा बेड होते... सर्व शांत पणे ऐकत असल्याचे जाणवत होते. स्टाॅफ पण ऐकत असे. चार पांच दिवस असे निघुन गेले. प्रकृती त बरीच अपेक्षित प्रगती होत होती. गुरुवारी२२एप्रील सकाळी सकाळी सहा वाजता स्वामी गजानन महाराजांचे निषंक होई रे मना लावुन शांत पणे एक एक शब्द ऐकत एका प्रसन्न धुंदीत जागे झोपेत अवस्थेत होतो. कीती वेळ गेला कळलेच नाही. समोरच्या बेड वरील ४२/४४ वर्षे वयाच्या पेशंट अगदी हसतमुख चेहऱ्याने माझ्या कडे बघून बोलला.... "आज पंधरा दिवसांनी इतके बरे वाटते आहे या मंत्राचा फार छान प्रभाव पडला... फार छान वाटलं. ते उठुन दांत घासायला प्रथमच स्वतः चालत गेले.

त्यांच्या चेहऱ्यावर दिसणारे तेज एक अनुभुती देउन गेले. समोर चे तिन चार पेशंट सुध्दा फारच प्रसन्न दिसत होते. नाष्ट्याला शाबुदाणा खिचडी आली. समोर चा पेशंट बोलला "महाराजांचा प्रसाद मिळाला.....

डाॅक्टर आले... तपासणी झाली... त्या दिवशी तीन/चार पेशंट ला डिस्चार्ज मीळाला त्यात मी पण होतो.तेथे परिश्रम करुन न चिडता काम करणाऱ्या स्टॉफ ला अनंत अनंत प्रणाम.

श्री स्वामी समर्थ जय जय स्वामी समर्थ 🙏🙏🙏🙏🙏🙏🙏🙏🙏🙏

कोविड ने शिकवली माणुसकी

- श्रीमती प्रतिभा गोखले

'झुंज' एका प्रतिस्पर्ध्याने आपल्याच तोडीच्या प्रतिस्पर्ध्याशी दिलेली झुंज. जिंकण्यासाठी केलेली झुंज. हार-जीतचा खेळ, यश मिळवण्यासाठी केलेली झुंज. मग ती पक्ष्यांमध्ये असो की प्राण्यांमध्ये असो की कुस्तीगिरांमध्ये असो, माणसामाणसात सुद्धा असो. जय मिळवणं हेच लक्ष. निसर्गालाही झुंज द्यावी लागते. वादळाशी-सोसाट्याचा वारा, वादळी पाऊस, कडाडणाऱ्या विजा - ही झुंज असते स्वतःच्या बचावासाठी.

माणुसही प्राप्त प्रतिकुल परिस्थितीला अनुकुल करण्यासाठी झुंजतच असतो आणि ती झुंज जीवघेणी असते. वादळ येत तस त्याच काम करून ते निघुनही जात. राहतात त्या मागे ठेवून गेलेल्या पाऊल खुणा, पण त्याच शिकवितात, देतात आपल्याला पुन्हा उभे राहण्याचे बळ. असच काहीस झाल दोन वर्षांपूर्वी - साऱ्या जगावर आलं 'कोविड' रोगाचं, महामारीच वादळ - मार्च २०२० ते २०२२ प्रदीर्घ काळ महामारीच्या वादळाचा. क्षणभर वाटल तो प्रदीर्घ काळाचा काळ पडदा वर करून बघाव - उचलला आणि आत डोकावून बघितले मात्र - दचकलेच! ती कोविड १९ ची महामारीची वर्षे मला वाकुल्या दाखवत होती. भीतीने पुन्हा मन भरून गेले. आर्त आक्रोश करणारे केविलवाणे चेहेरे माझ्याकडे पाहत होते.

आप्त-सकीय, सगे-सोयरे यांच्याशी झालेली कायमची ताटातूट मनाला विषण्ण करून टाकत होती. आणि मी हतबल होऊन नुसत ते पाहून त्या काळ्या आठवणींना अश्रूंची श्रद्धांजली अर्पण करीत होते. पडदा हळूच खाली सरकवला आणि डोळे मिटले. बरेच विचार चलत-चित्रपटाप्रमाणे डोळ्या समोरून सरकू लागले. सारखे येणारे ऍम्बुलन्सचे सायरनचे आवाज रात्री-अपरात्री केव्हाही-धडकी भरायची. किती वेळा दूरदर्शन लावून समाचार ऐकायचे आणि त्या महामारीच्या जगात चाललेले थैमान पाहून विषण्णता मनाला येत असे. खूप भयावह होती ती झुंज. अचानक आलेले वादळ खूप हानी करून गेले.

मनुष्य हानी, वित्तीय हानी-बरच काही. माणसे त्याला टक्कर देत राहिली. झुंजत राहिली-मुलांनी आई वडिलांचे छत्र हरवले. आजी आजोबांची आधाराची काठीच मोडून पडली. काहींची आई राहिली आणि वडील हिरावले तर काहींचे वडील राहिले आणि आई हिरावली गेली. दे माय धरणी ठाय अशी अवस्था झाली. हॉस्पिटलमध्ये बेड मिळवण्यासाठी, प्राणवायूचे सिलेंडर मिळवण्यासाठी जिवाचे रान करावे लागले. लाचार व्हाव लागल. त्यात प्रचंड लुटालूट झाली. एवढेच नाही तर वेळेत त्या सोयी उपलब्ध न झाल्याने त्या रोग्याची श्वास घेण्याची चाललेली धडपड आणि शेवटी त्याचा अंत उघड्या डोळ्यांनी पहाव लागल. उंदरांसारखी मारून पडलेली माणसे, त्यांना उचलण्यासाठी कोणाचे हात नाहीत की स्मशानापर्यंत कोणाला जाता येत नाही इतकी वाईट दयनीय परिस्तिथी पाहिली, अनुभवली.

एवढ्या मायस्क्रोपिक विषाणूने क्षणात जगाची सारी चक्रे थांबविली. अमेरिका, युरोप, आशियाई देश-यंत्र-विज्ञानाचा अतिउच्च बिंदू गाठलेली राष्ट्र त्याच्या पुढे अक्षरशः आडवी झाली - चारी मुंड्या चीत झाली. हॉस्पिटलमधे निर्माण केलेले कोविद रोग्यांचे वॉर्ड - बचाव किट - अंगावर चढवून अथक रोग्यांची सेवा करणारे त्यांचे लाख मोलाचे प्राण वाचविण्यासाठी धडपडणारी डॉक्टरांची पथके, परिचारिका - साऱ्यांचीच वेगवेगळ्या पातळीवर चाललेली जीवघेणी झुंज. त्यांनी त्यांच्या घराशी घेतलेली फारकत - स्वतःचे जीव धोक्यात घालून दुसऱ्यांचे प्राण वाचवण्याची

दाखवलेली हिम्मत. सुरक्षा दले, वस्तू पुरवठा करणारी वाहने, त्यांचे चालक, कुणीही कमी पडले नाही ह्या झुंजीत. मला तर वाटले बेधुंद झालेल्या माणसाला शुद्धीवर आणण्यासाठी नियंत्याने दिलेली ही एक चपराकच म्हणावी लागेल. पैसे मिळवून तो उधळण्याची सवय लागलेल्या माणसाला पै पै साठी मोताद व्हाव लागल. भित्यापाठी ब्रह्मराक्षक अशी स्थिती झाली.

जरा खोकला, सर्दी झाली की मला कोविड तर नाहीना झाला अशी शंकेची पाल चुकचुकायची. सर्वांसाठी हा रोग आरोग्याचा बागुलबुवाच झाला. कोणाशी बोलण, हस्तांदोलन करण धोक्याचा झाल. अस्पृश्यता काय त्याच दुःख काय याची प्रचिती पावलोपावली या झुंजीत माणसाला आली. इम्म्युनिटी पॉवर, ऑक्सिजन लेवल, सॅनिटायझेशन, मास्क साऱ्या शब्दांनी इतका पिच्छा पुरविला की कोविडची एक भाषाच बनून गेली. पण त्यात माणुसकी खडबडून जागी झाली. दातृत्व सद्गुणाने उचल खाल्ली. कोणी उपाशी झोपणार नाही यासाठी सेवाभावी संस्था, केंद्र राज्य सरकारे उदारपणे अन्नधान्य वाटपासाठी पुढे आले. रस्त्याच्या आडोशाला राहणारी माणस या मदतीवर कशी बशी तग धरून राहिली. कोविडशी झुंज देऊन, बरी होऊन आलेली माणसे काही तरी युद्ध जिंकलेल्या आवेशात घरी आली. पण शहरे, तालुके, जिल्हे इथे महामारीचे थैमान चालू असताना दूर खेड्यात असलेली माणसे बिनधास्त फिरत होती. मग प्रश्न पडला - निसर्गानेच त्यांची हम्मुनिटी, ऑक्सिजन लेवल बॅलन्स केले होते का?

मला वाटल ही भाबडी मानस निसर्गावर प्रेम करणारी, साधी खाणी-साधी रहाणी-उच्च विचारसरणी हेच खर सुरक्षित जीवन असाव. आता परिस्थिती जरा निवळली आहे. बऱ्यापैकी सुरळीत जीवन सुरु झाल आहे. तरी समुदायात वावरताना भीती पाठ सोडत नाही. पण आता गरज आहे वावरण्याची नाही तर पागलांच एक झंजावती वादळ येईल, पुन्हा झुंज वेगळीच. तेव्हा आत्मकेंद्रीपणा दूर सोडून वावरा - तुला हरण्याची सवय नाही माणसा, तेव्हा असाच पुढे चालत रहा - वादळाने जाताना काही पाऊलखुणा ठेवल्या आहेत, त्याच देतील तुला पुन्हा उभे राहण्याचे बळ. जे गेले ते गेले. मागे राहिलेल्याना जगणे क्रमप्राप्तच आहे. तेव्हां आता तुला समोर आलेल्या आव्हानांशी झुंज द्यायची आहे. तयारी कर - जगू या हिमतीने, मरुया कीर्तीने.

|| न्यू इंग्लंड मराठी मंडळ ||
NEW ENGLAND MARATHI MANDAL

मदतीची हाक

मंडळातर्फे आयोजित केलेल्या कार्यक्रमांना गरज आहे तुमच्या मदतीची , सहकार्याची, आणि सहभागाची.

नोंदणीसाठी कृपया संपर्क करा - HYPERLINK
"http://nemm.org/index.php/requests/volunteer"
http://nemm.org/index.php/requests/volunteer

***Student volunteering hours will be recongnized.

आधुनिक श्रावणबाळ

लेखक: डॉ डी आर डोके

जोशी काका, काकू कोरेगाव पार्क पुणे इथे राहत असत. पुण्यामध्ये लोकसंख्येच्या मानाने कमीतकमी १० ते १२ टक्के वयस्कर जोडपी आहेत, ज्यांची मुले - मुली, अमेरिका, ऑस्ट्रेलिया, जर्मनी, दुबई अशा अनेक देशांत राहतात.

जोशींचीही मुलगा सून अमेरिकेत चांगल्या नोकरीत आहेत. नातू डॉक्टर झाला. दोघे आजी-आजोबा अगदी साधे, सरळ मनाचे कोणाच्या अध्यात ना मध्यात. आमच्या हास्य क्लबचे मात्र सक्रिय सभासद होते. जोशी आजोबा त्यांचे वय ८७-८८ च्या घरात मात्र मानाने अगदी नवतरुण, हास्यविनोदात तरबेज, त्यांच्या चुटक्यांची, विनोदांची आठवण होऊन मला आजही हसू फुटते.

त्यांना कोणी कितीही चिडवलं तरी कुणावर रागावणार नाही. त्यांच्या स्वभावाचा गैरफायदा घेऊन आमच्यातील काही लोक त्यांच्यावर वैयक्तिक कौटुंबिक टीकाटिप्पणी करीत, जोशीबुवा मात्र या सर्वांना पुरून उरत, म्हणत अज्ञानी आहेत त्यांचं कशाला मनाला लावून घ्यायचं?

त्यांना खूप वर्षांपासून डायबेटीस होता, ब्लड शुगर लेवल कधीही २००-२५० च्या खाली राहात नसे, याची त्यांनी कधीही फिकीर केली नाही, त्यांचा गोड खाण्यावर कंट्रोल नसायचा, बासुंदी जिलेबी म्हणजे जीव कि प्राण. तंबाकूचा व्यसनही तेवढच अनियंत्रित. त्यांची पत्नी त्यांना तंबाकू मिळू नये म्हणून, त्यांना पोहोचता येणार नाही अशा जागी लपवून ठेवत असे. लपवलेला तंबाकू शोधण्याच्या प्रयत्नात ते एक दोन वेळा पडले देखील.

त्यांच्या अनियंत्रित डायबेटीस मुळे तसेच वेगवेगळ्या कारणांकरता त्यांना हॉस्पिटल मध्ये ऍडमिट व्हावं लागायचं. एक दोन वेळा शिंगल्स हि झाले. माईल्ड पॅरालिसिस झाला, पण या सर्व आघातातून ते सही सलामत बाहेर यायचे, म्हणायचे माझी टिंगल टवाळी करणारे हे सर्व आहेत ना, त्यां सगळ्यांची पाठवणी करूनच मग मी मरणार आहे, माझी काही काळजी करू नका.

असे जोशी काका काकू अनेक वेळा अमेरिकेत गेले, आपल्या मुलाच्या कुटुंबात रमले, पण त्यांना आपल्या देशाची, कर्मभूमीची या घराची ओढ मात्र कायम भारतात आणत राहिली.

एव्हढ्यात वयोमानानुसार त्यांना अमेरिकेत जाण्यायेण्याचा दगदग सहन होत नसे, पण नाईलाजाने अमेरिकेतील मुलगा, नातू , सून, यांच्या ओढीने जात राहिले.

असेच ते २०१८ च्या सप्टेंबर ऑक्टोबर मध्ये अमेरिकेतील फेरी मारून आले. आल्या आल्या काकू थकलेल्या दिसू लागल्या. काका मात्र थकव्यातून लवकर बाहेर आले. आमच्या बरोबर हास्य क्लब मध्ये आधीच्याच उत्साहाने सामील झाले, काकू मात्र थकव्यातून बाहेर येतांना दिसत नव्हत्या, उलट अधिक थकत चाललेल्या दिसल्या. त्यांच्या फॅमिली डॉक्टरांना कंसल्ट केल्यावर समजले कि त्यांना प्रोग्रेससिव्ह इंटरस्टिशियल लंग फायब्रोसिस हा

आजार आहे व तो त्यांच्या फुफुसाचा अधिक अधिक भाग व्यापतो आहे.

मुलाला हि बातमी समजली व रोगाची गंभीरता हि समजली, तसा तो तेथील काम सोडून पुण्याला आला. आजार गंभीर होत गेला. दोन-तीन महिन्यात काकू वारल्या. काका हया धक्क्याने खचून गेले, त्यांचा आतापर्यंतचा आत्मविश्वास ढासळला. त्यांनी हास्य क्लब ला येणे बंद केले व घरीच राहू लागले. मुलगा आईच्या निधनानंतर वडिलांची देखभाल करण्याकरिता पुण्यातच राहिला. तोही वडिलांप्रमाणे सर्वामध्ये मिळूनमिसळून, सगळ्यांशी चांगले संबंध ठेऊन, वडिलांची देखभाल करीत होता, मदतीसाठी एक केअर टेकर हि ठेवला.

२०१९ च्या अखेरीस कोवीड १९ ने पुण्यात व देशात प्रवेश केला. जोशी काका घरातच राहत असल्यामुळे त्यांना पहिल्या व दुसऱ्या लाटेतही कोवीड झाला नाही. पण साधारण नियम शिथिल होत असतांना व कोवीड रुग्णांची संख्या कमी होत असतांना, त्यांना कोविड ने गाठले, त्यांना हॉस्पिटल मध्ये भरती करावे लागले, मुलालाही त्यांच्याबरोबर हॉस्पिटल मध्ये जाऊन त्यांची व्यवस्था करावी लागली. काका मात्र या वेळी रुग्णालयातून बाहेर येऊ शकले नाही.

मी स्वतः दररोज सकाळी स्वतः ची काळजी घेऊन फिरायला जात असे. काकांचा मुलगा मला आठवड्यातून तीन चार वेळी तरी भेटून हसत मुखाने माझी विचारपूस करीत असे. माझ्या पोशाखाच्या बदलानुसार विनोद करीत असे, जसा कि आज थंडी वाढलेली दिसते किंवा कमी झालेली दिसते वगैरे. त्याचे मला भेटणे अचानक बंद झाले. तेंव्हा कोविड रेस्ट्रीकशन मुळे जास्त कुणी भेटायचे नाही, जरी कुणी भेटलेच तर त्यांना देखील जोशींच्या मुला बद्दल काही माहिती नसायची. मला राहवले नाही म्हणून एक दिवस मी त्यांच्या कॉलनीत जाऊन विचारपूस केल्यावर समजले कि जोशींच्या मुलाला देखील कोविड मुळे रुग्णालयात दाखल करावे लागलेले आहे. मी हादरलोच, आई वडिलांची सेवा करण्याकरिता परदेशातून आलेल्या, पन्नाशीच्या धडधाकट मुलाला कोविड झाला हि घटना काळजाला चटका लावणारी होती. त्यातच काही दिवसांनी त्याचेही निधन झाले. रुग्णालयात चवकशी केल्यावर समजले कि त्यालादेखी त्याच्या आईप्रमाणे प्रोग्रेसिव्ह इंटरस्टिशियल लंग फायब्रोसिस ने गाठले होते, व त्यातच कोविड जो कि सर्वात जास्त फुफुसांवरच आघात करतो, तो झाला त्यामुळे कॉम्प्लिकेशन होऊन त्यातच त्याचा मृत्यू झाला.

मला तर तो आधुनिक श्रावण बाळचं वाटतो. आपल्या देशातील कुटुंबव्यवस्था अजूनही बऱ्याच चांगल्याप्रकारे बळकट आहे, म्हणूनच जोशी काकांच्या मुलाने आपल्या आईवडिलांच्या सेवा शुश्रूषेला अधिक महत्व दिले व स्वतःचे आयुष्य पणाला लावून आपले पितृऋण फेडले.

भारतीय संस्कृतीनुसार धर्म, अर्थ, काम व मोक्ष हे चार पुरुषार्थ गाठणे नक्कीच आवश्यक आहे, त्याकरताच कुटुंबव्यवस्था मजबूत असणे गरजेचे आहे, असे मला वाटते. त्यातून सर्वांना व्यापक ध्येय गाठण्याची प्रेरणा मिळते. आपल्या अंतःकरण चतुष्टयला तेच अपेक्षित आहे नाहीतर नुसतेच अर्थ व काम हयाच कृतीवर भर दिला तर बाजारू संस्कृतीच उदयाला येईल अशी माझी धारणा आहे.

कविता

स्वर्गसुख

- ज्योति जोशी

स्वप्न रंगवायचीच झाली
तर घेईन मी उंच झोका
आकाशाला गवसणी घालत
कां नाही... कां नाही?
माळीन माझ्या केसांत नक्षत्र तारका
कां नाही... कां नाही?
स्वप्न रंगवायचीच झाली
तर घेईन उसने रंग इंद्रधनुष्या कडून...
पण आत्ता या क्षणी करोनाच्या बंदिवासात
या चार भिंतीतच शोधायचं मला स्वर्ग सुख!

आता स्वतः साठी जगा

- श्रीनिवास जांभेकर

हि कविता साठी ओलांडलेल्या सर्व स्त्रियांसाठी आहे. तुम्ही स्त्रिया जीवनाच रहाटगाडट चालवताना विविध भुमिका निभावता, कुटूंबातल्या सदस्यांसाठी जगतां . आपल्या स्वतःच्या आवडीनिवडींना मुरड घालता.. या संसारपाशातून बाहेर येऊन स्वतःसाठी कधी जगत नाही.

आता स्वत:साठी जगा
मला जमत नाही अस नाही कधी म्हणायच
आपलं जीवन आपल्या मर्जीनुसार जगायचं !

आयुष्याच्या प्रत्येक टप्प्यात आपण वेगवेगळ्या जवाबदार्या पेलल्याचं ना !
मुलगी, सून आई पत्नी सासू आजी या भुमिका यशस्वी केल्याच ना?
सगळ्यांच्या मरज्या सांभाळल्याच नां?
मग आता या सगळ्यातनं मुक्त व्हायचं
सगळ्यांना स्वावलंबी व्हा म्हणायच
आपल् सुख आपणच शोधायचं
आणि जीवन आपल्या मर्जीनुसार जगायचं !

मला हे जमणार नाही अस का म्हणायचं ?
प्रयत्नांती परमेश्वर हे मनाला शिकवायचं
मनातील भितीला दूर पळवायच
नवचैतन्याने सगळीकडे बागडायच
जे जे आवडत ते अनुभवायचं
कोणावर आता नाही रागवायचं
अपयशाने नाही नाउमेद व्हायचं
आणि जीवन आपल्या मर्जीनुसार जगायचं !

मानव जन्म एकदाच मिळतो अस म्हणतात
संसाराच्या विवंचनेत सारेच अडकलेले असतात
जगात दुःख कुणाला बरे नसतात?
म्हणून का आपण खचून जायच?
जन्मभर कुढतच बसायचं ?
आयुष्य काय फक्त दुसर्यांसाठीच जगायचं ?
हे दिवस आता माझे आहेत हे मनाला सांगायचं
आणि जीवन आपल्या मर्जीनुसार जगायचं !

करोनाच्या साथीत

- ज्योति जोशी

एक दार बंद झालं... नी दुसर उघडलं
बाहेर जायचं नाही त्यामुळे laundry कमी .
दादा म्हणायचे एक दांडीवर नी एक xxxx वर
मी एकाच खोलीत, तिथेच काय तो ज्योतीचा उजेड
बाकीकडे दिवे बंद सबब वीजेच बिल कमी झाल.
घरांत बंदी झाले...पण प्रत्येक काना कोपऱ्यातल्या वस्तू प्रेमाने मलाच न्याहाळू लागल्या
नी त्या मागच्या जुन्या आठवणी स्वैर झाल्या.

आरशात बघायचं बंद झालं पण मनाच्या आरशात वरचेवर डोकावू लागले.
खिडकीतून बाहेर बघतांना झाडांचे वठलेले सांगाडे मला सांगू लागले
अग आम्ही थिजलो असलो तरी अंगात अजून हिरवेपणा आहे.
नी मग बसंताची रग आगंतुकपणे माझ्या मनात रुतली!
एखादा पक्षी फांदीवर बसला, की मी नव्याने मला परत सापडू लागले.

टीव्ही वरच्या कोव्हीड बातम्यांनी घायाळ झाले, कधी चिडले पण लहाना पासून मोठ्या पर्यंत सगळे करोनाच्या रुग्णांना उत्साहाने मदत करताना पाहून
मी ही आठवणीने भुकेलेल्यांना मदत करू लागले,
'वदनी कवल घेतां' ना एक वेगळीच सात्त्विक तृप्ती जेवणा आधीच मिळाली.

बरेच वेळा म्हणत होते की एखाद्या आश्रमात काही दिवस राहायचं...
आतां माझंच घर एक आश्रम बनवलं नी शिबीर चालू केले.
आजवर एका शिस्तीत चाकोरीत आयुष्य घालवल पण आतां या शिबिरात मन मानेल तसं वागायला परवानगी मिळाली.

कुठे जायचं नसत मग घड्याळ्याचे काटे स्थगित केले.
क्यालेंडवरचे सातही दिवस रविवार झाले.

जाग आली की उठा नी रात्री एखादा मस्त सिनेमा पाहून झोपेच्या आधीन स्वाधीन व्हा .
या सगळ्यातून वेळ मिळाला तर घरकाम... ते कुठे जाणार.
पण तरीही हे सार करताना मध्येच एकदम मन मरगळत
मग मी छपराचे आभार मानते,
बाहेर कडाक्याची थंडी तरी घरातली शेकोटी मला ऊब देऊन जाते
तेंव्हा अंगावरच्या लोकरी कपड्यांना कुरवाळत
मी देवाशी कृतदन्य होते.

नी सगळ्या करोनाच्या आजाऱ्याना प्रार्थना पाठवते.
आतां मनातल्या कवितेला जीवापाड जपू लागलेय,
रंगपंचमीत खेळू लागलेय.
मी जीवनावर पुर्वीसारख परत प्रेम करू लागले.

तिच्या स्वरांचे संदर्भ

- किरण शिवहर डोंगरदिवे, बुलढाणा

(लता मंगेशकर ह्यांच्या निमित्ताने)

पाऊस तिच्या स्वरांनी नव्याने होत असे नितळ
ती गायली की ह्या मनाची मिटत असे मरगळ
तिच्या कंठातून उगवायची मनाची ओली हिरवळ
सखे तिच्या आरसपाणी स्वरांनी झिजलेत कातळ
स्वराधाराचे अंगभर घाव तरी दिसत नाहीत वळ
झिम्माड बरसला तरी कायम मनावरच मभळ
कोणतेच झाड लावत नाही पावसाविरुद्ध बळ
गुमान झेलून धारा म्हणते पावसा पुन्हा कोसळ
मल्हार नसतो साधा, चिंब भिजवत जातो खोल
अवचित पुन्हा दाटून येतात सखीचे अलवार बोल
तिची ती राधा, स्वरात गुंजायचे कृष्णाचे रूप नवे
तिच्या दिपरागाने पेटत कालिंदीच्या पाण्यात दिवे
तिला नव्हती पर्वा, तिला नव्हती तमा, नव्हता सोस
तिचं आपल्यावरच रुसणं हा काय पावसाचा दोष?
म्हणून आपण झिम्माड बरसाव आपल्या मस्तीत
जरी राहत नसलो आपण तिच्या मल्हार वस्तीत
सखी गाते आळविते उधळून स्वराचे रेशमी ढग
ढगविभोर दुःख सखीची भैरवी वाढवते तगमग
हे दुःख त्या मोरांचे जे भिजत नाहीत पावसात
तिच्या प्रार्थनेची फुकर उरे नास्तिकाच्या नवसात

COVID

- स्वाती नामजोशी नातू

रात्री अंथरुणावर अंग टाकताना
नजर जाते खिडकीबाहेर,
डोळ्यांना दिसते कोविड सेंटर
सकाळी अंथरुणातून उठताना
सहज लक्ष जाते खिडकीबाहेर
आणि डोळ्यांना दिसते कोविड सेंटर

अन् दिवस-रात्र ऐकू येत राहतात
ॲम्ब्यूलन्सच्या सायरनचे चित्रविचित्र आवाज
नकोसे वाटणारे...

आर्ट गॅलरीत, कोविड सेंटर...
मोठा विनोद ... ज्यावर हसताही येत नाही
परमेश्वराने निर्माण केलेल्या,
माणूस नावाच्या सुंदर कलाकृतीला ...
लागलं आहे ग्रहण...
महत्वाकांक्षेच , हव्यासाचं नि लालसेचं

कोविड सेंटरच्या अल्याड आहे ,
विघ्नहर्त्याचं मंदिर आणि पल्याड आहे,
जीवनाचं अंतिम सत्य...स्मशान
आता तिथेही रांगा असतात म्हणे

कोविड सेंटर मधील रूग्ण
कोणता विचार करत असतील?
अल्याडचा की पल्याडच्या?

उगाचच मनात विचार आला...
आज मी सूपात आहे उद्या?
तत्क्षणी आतून आवाज आला
जे कृष्णाला असेल मंजूर...
सारेच कृष्णार्पण ...

Home

- मीरा साळुंके

Through the darkness of winter,
Through the warmth of summer
Such a crisp smell of oak welcomes thy, into my abode.

When swimming swiftly like a swan,
Or dancing through the fresh green grass,
Then to scramble from the chirps of the excited children just at the break of dawn.

Such silence welcomes thy, to a place
I can hang my coat.
Thy can go by car or take a boat.
But I'll remain here,
In a place I call
HOME!!!



Chocolate Lindor

- मीरा साळुंके

The electric crackle
Of wrappers being untwirled.
Left with a smooth round ball
Of earthy brown light coco, milky white, or deep coffee.
Inching towards your face, a smell of melted sugar, bittersweet sweetness, or golden honey.
Effortless, your teeth break into thin layer of chocolate
A small snap, burst open, as a chick would from its egg.
Textures change, your muscles relax.
Biting into a smooth, creamy center.
For a split second, you, and your cravings.
Slowly it melts in your mouth.
Unfolds, like an origami swan.
Try to hold on,
To the sensation.
When finally, your only left, with the ghosting taste
Of Lindt,
Then there is again,
The electric crackle,
Of wrappers being untwirled,
Chocolate LINDOR!!!

Friend

- मीरा साळुंके

I have a friend, how
many of you got that.
I have a friend, friends
till the end.

No matter what
situation, I've got a
friend.
We'll stay together,
we'll be forever yeah,
I'll run through the bad
and I'll storm through
the worst
To be with you.

You know what we've
been through.
Together we are
something completely
new.

Look out for us,
we are coming in
strong.
We can knock down
any wall.

Together we stand tall
We can do anything at
all.

I have a friend, friends
till the end!!!

वादळी

- नयना निगळये

झुळूक मंद मोहरते
वादळी असावध वेळी
परसात वाकल्या थोड्या
पिकलेल्या गाभण केळी

वाऱ्याची साद शिळेची
सळसळली पानांत
पानगळीचे काहूर
कातर रान मनांत

वाऱ्याचा अवखळ झिम्मा
रानात पेटले पान
विझलेल्या वणव्यामागे
दग्ध एकटे रान

विणलेली अर्धी घरटी
अर्ध्यातच धुरकटलेली
ती हिरवी पिवळी माया
मग भूतबाभळी झाली

नाजूकशा थेंबामधूनी
तरंग अलगद झरला
प्रलयाच्या लाटेमध्ये
निःशब्द किनारा उरला

कोकणातल्या डोंगर आणि सागर किनाऱ्याच्या संगमावर साकारलेली ही कविता कोकणातून घाटांवर जाणाऱ्या एका वादळाचा माग घेते. डोंरकपारीतील सुखावणारी मंद झुळूक बघता बघता वादळी बनते आणि क्षणार्धात शांत कोकण उध्वस्त करते. पायथ्याशी खळखळणारा किनारा मात्र तसाच धीर देत उभा... अगदी निःशब्द...

जीवन तरी निसर्गाहुन वेगळं थोडंच असतं! कधी कधी एखादी मंद शांत झुळूक नकळत वादळी बनते आणी घेते सर्वस्वाची आहुती. या साध्याशा जगरहाटीचा एका स्त्रीच्या दृष्टीकोनातून मागोवा आणि तिच्यातील 'बाई' आणि 'आई' मधील अटळ द्वंव. 'ती'च्यातील बाई पानाएव्हढी आणि आई रानाएव्हढी. या वादळी वणव्यात सुगरणीच्या घरट्यानी लगडलेलं हिरवे पिवळे बाभूळबन सुकून काटेरी, आईची वत्सल माया वगळता उरते ती एकटी काटेरी बाभूळ. एकट्या बाभळीपाशी भूतं गोळा होतात हा कोकणी लोकप्रवाद. जेव्हा वादळ वणवा सरून जातो तेव्हा उरते ती फक्त आई; निःश्चल, अफाट सामर्थ्याने

|| न्यू इंग्लंड मराठी मंडळ ||
NEW ENGLAND MARATHI MANDAL

अनुबंध नोव्हेंबर 2022

शब्दकोडे सोडवा

	१		१६				५
	२						
					४		
३							
				६	१३		
८				१४			
९	१०	११					७
	१२					१५	

उभे शब्द

१. कोविड मुळे करण्यात आलेली संचारबंदी (इंग्लिशमध्ये)

५. कोविड मुळे श्वसनाला होणाऱ्या त्रासापासून वाचविण्यासाठी हे वापरतात (इंग्लिशमध्ये)

६. खूप किंवा इंग्रजीमध्ये दूर

७. या देशातुन कोविड चा संसर्ग चालू झाला

८. वेळ आली की ज्याचा दुत न्यायला येतो तो

१०. कोरोनाच्या काळी सगळ्यांनी एकमेकांना मदतीचा .. पुढे केला

११. आईचा भाऊ

१३. गाणे लिहिताना हे जुळवावे लागते

१६. गांधीजींचे सूत कातण्याने यंत्र

आडवे शब्द

२. प्रत्येक देशाने कोरोना व्हायरस पसरू नये म्हणून बंदोबस्त करण्यात काही ... सोडली नाही

३. अमेरिकेच्या अध्यक्षांचे वैद्यकीय सल्लागार (आडनाव)

४. कडू भाजी

६. कोविड व्हॅक्सिन बनवणारी एक कंपनी

९. Pandemic ला मराठीत काय म्हणतात

१२ कोविड ने कुणाचीही ..... बाळगली नाही

१४. दारूचा एक प्रकार

१५. मासा, एका राशीचे नाव किंवा इंगजीमध्ये संकुचित

१६. चकचकीत, झळाळी

** संपूर्ण शब्दकोडे सोडवून anubandh@nemm.org या पत्त्यावर पाठवा, सर्व प्रथम आलेल्या बरोबर उत्तरास, मंडळातर्फे एक भेटवस्तू देण्यात येईल.

चित्रकला

सची रासने



तन्वी कटके

सोनाली गोखले

Thousands of years old Indian Yogic tradition believes that there are seven prominent Chakras or energy centres in human body. Chakras are thought to provide subtle energy that helps your organs, mind and intellect to work in a best possible way. These chakras work in coordination. All chakras need to be properly taken care of to avoid any imbalance in human body. Considering this basic principle of health, during Covid , I thought of seven important things which if we apply in our daily routine, can keep the Covid at bay. And created this art work.



विशेष आभार

न्यू इंग्लंड मराठी मंडळाच्या विविध कार्यक्रमांमध्ये खालील तरुणांनी खूप मोलाची मदत केली, त्याबद्दल त्यांचे आभार.

1. Hardini Shinde- fundraising
2. Sneha Bhanushali- fundraising
3. Sachi Rasne - fundraising
4. Ashmi Arkshali- fundraising
5. Shalmali Kulkarni - fundraising
6. Renuka Late - Registration
7. Sara Dixikar- Registration
8. Shamika Krantikar - photographer
10. Arnesh Yeola
11. Anvay Salvi
12. Tanvi Nawale
13. Nihika Yeola - Tasha
15. Shlok Mahajan - Dhol
16 Aarush Patankar - Dhol
17. Aaryav Patankar - Dhol
18. Sarthak Chitari - Dhol - Part of BMM group
19. Siya Kulkarni - Dhol (Not part of Dhol)
20. Rajveer Kulkarni- Dhol (Not part of Dhol)
21. Ishita Pharande - Dhol
22. Avani Athale - Dhol
23. Saniya Sarolkar - Dhol - Part of BMM group
24. Arya Gokhale - Lezim
25. Ridhima Gaikwad - Lezim
26. Ananya Godbole - Lezim
27. Avani Sachin Bhide - Zenda
28. Arnav Manjrekar - Dhol + auditorium event ticket check
29. Vidhi Phirke - Tasha
30. Swara Kulkarni- Anubandh
31. Aditi Nawale - Tasha
32: Akshaya Kadam: Lezim
33. Sanika Desai- Dhol
34. Aarya Wachasunder- Dhol - Part of BMM group
35. Mihir Vidhate - Tasha
36. Soham Kadam - Tasha
37. Riya Sarode - from lezim group
38. Aniruddha Sudhir Doke - Dhol
39. Sanika Swapnil Mahajan - Shobha Yatra & Ganapati for Zenda

|| न्यू इंग्लंड मराठी मंडळ ||
NEW ENGLAND MARATHI MANDAL

अनुबंध नोव्हेंबर 2022

आवाहन (पुढचे लिखाण)

नमस्कार मंडळी,

न्यू इंग्लंड मराठी मंडळ आपल्या विविध उपक्रमांद्वारे आपल्या सभासदांशी सातत्याने संवाद साधत असते. हाच संवाद 'अनुबंध' या मासिकाद्वारे द्विगुणित करण्यासाठी आम्ही प्रयत्नशील आहे. त्यासाठी लागणार आहे तुमची साथ.

आपल्या अनुबंध साठी तुम्ही आमच्याकडे पाठवायचे आहे तुम्ही लिहिलेल्या कथा,ललित लेख, केलेल्या कविता, वाचलेल्या पुस्तकाचे परीक्षण,भेट दिलेल्या एखाद्या ठिकाणचे वर्णन, आठवण किंवा तुमच्या कॅमेरातुन काढलेली काही क्षणचित्रे,आपल्याला आवडलेला खाद्यपदार्थ आणि त्याची पाककृती , कला दालन या सदरात अपेक्षित आहे तुम्ही काढलेली हस्त-चित्रे, व्यंगचित्र, शब्दकोडी आणि अजुन बरेच काही तुम्ही लिहिलेले साहित्य .... . तसेच आपल्या छोट्या दोस्तांनी लिहिल्या गोष्टी, कविता, काढलेली चित्रे, हस्त-कलेचे, lego पासून बनवलेल्या creation ची क्षणचित्रे....

साहित्य पाठवण्यासाठी ई-मेल - registration@nemm.org

नियम :

- आपल्या लिखाणास वयोमर्यादेचे बंधन नाही. (लहानांपासून आजी आजोबांपर्यंत कोणीही लिहू शकते!)
- तुमचे साहित्य मराठी किंवा इंग्लिश भाषेमध्ये .doc फाईल मध्ये पाठवायचे आहे.
- आपले लिखाण जर कथा, प्रवासवर्णन या प्रकारात मोडत असेल तर शब्द मर्यादा १२००, माहिती स्वरूपातील लेख साधारण शब्द मर्यादा ४५० इतकी असावी.
- आपले साहित्य लेखाचा विषय नोंद करा.
- उचित व दर्जेदार लेखनास/साहित्यास प्राधान्य देण्यात येईल.
- साहित्य व लिखाण मिळाल्यावर पोच ई-मेलने दिली जाईल.
- फोटो, कलाकृती, जाहिरात Jpeg format मध्ये पाठवावे.
- 'अनुबंध' बद्दल आपला अभिप्राय registration@nemm.org या ई-मेल आयडी वर जरूर कळवा.